अहवाल क्रमांक : १९१

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

लातूर जिल्हा परिषदेच्या सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

# बारावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०२२

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

लातूर जिल्हा परिषदेच्या सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

# बारावा अहवाल

## पंचायती राज समिती

(सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. प्रदिप जैस्वाल, वि.स.स

(३) श्री. कैलास पाटील (घाडगे) वि.स.स,

(४) डॉ. राहूल पाटील वि.स.स.

(५) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(६) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीपराव बनकर, वि.स.स.

(८) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(९) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(१०) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

(११) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(१२) श्री. हरीभाऊ बागडे, वि.स.स.

(१३) डॉ. विजयकुमार गावीत, वि.स.स.

(१४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(१५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(१६) *श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१८) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

(१९) श्रीमती मेघना बोर्डिकर-साकोरे, वि.स.स.

(२०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

(२१) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

(२२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२३) श्री. अमरनाथ राजुरकर, वि.प.स.

(२४) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२५) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(२८) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स.

(३१) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

(३२) श्री. सदाशिव खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. प्रकाश थिटे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

* डॉ.संजय कुटे, वि.स.स. यांनी समिती सदस्यपदाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर श्री. विजय रहांगडाले, वि.स.स. यांची " समिती सदस्य " म्हणून दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी पासून नामनियुक्ती केली.

## पंचायती राज समिती

(सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) *** रिक्त

(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२)*** रिक्त

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) * श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) ** श्री. निलय नाईक, वि.प.स.

(३१) ** श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सहसचिव (२)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकार

* श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

** श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

*** डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा ‘समिती प्रमुख’ या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन  पंचायती राज समितीचा बारावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता समिती दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला “Mini Legislature” सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ  शकणार  नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र  योजना  अस्तित्वात  आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा

गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-२०१८ साठी गठीत झालेल्या समितीने लातूर जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने लातूर जिल्हा परिषदेस दिनांक १०, ११ व १२ सप्टेंबर, २०१८ रोजी भेट देऊन डॉ.विपीन इटणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

तसेच सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी आणि सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ व १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी जिल्हा परिषद, लातूर संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री.राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, डॉ.नितीन करीर, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, डॉ.प्रदीप व्यास, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.संजय चहांदे, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग श्री.नंद कुमार, अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग), श्रीमती आय.ए.कुंदन, सचिव, महिला व बाल विकास विभाग, श्री.मंगेश मोहीते, सह सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.एस.डी सुर्यवंशी, सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.वि.ल.लहाने, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.सतिश तुपे, सह सचिव, वित्त विभाग, श्री.म.रं.शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. श्री.दे.लोढे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.पंडीत जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.प्रविण जैन, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.एकनाथ काशिनाथ गांगरे,

उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.आत्माराम लुबडे, अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.संतोष कराड, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.प्रमोद पाटील, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्रीमती नीला रानडे, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.विजयकुमार कलवले, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग, डॉ.विजय वृंदेवए, सह संचालक, आरोग्य विभाग, श्री. प्रताप मोहिते, श्री.सु.रा.भोसले, श्री.माधव नागरगोजे, संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या लातूर जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२०२१ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २२ मार्च, २०२२ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २२ मार्च, २०२२.

**संजय रायमुलकर**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ. क्र.<br>(१) | प्रकरण क्रमांक<br>(२) | विषय<br>(३) | पृष्ठ क्रमांक<br>(४) |
|---|---|---|---|
| १ | एक | गट शिक्षणाधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी यांनी शाळांना भेटी देण्याबाबत (पंचायत समिती औसा व रेणापूर) | १ |
| २ | दोन | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, करजगांव येथील शौचालयाच्या दुरावस्थेबाबत (पंचायत समिती, औसा) | ६ |
| ३ | तीन | शालेय पोषण आहार गोडाऊन (ता. शिरुर अनंतपाळ) येथे आढळून आलेली अनियमितता तसेच शालेय पोषण आहार करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग झाल्याबाबत | ८ |
| ४ | चार | सन २०१४-२०१५ या वर्षातील बाबनिहाय उत्पन्न व अखर्चित राहिलेल्या रक्कमांबाबत | १५ |
| | | **परिशिष्ट**<br>**समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, लातूर

## गट शिक्षणाधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी यांनी शाळांना भेटी देण्याबाबत

## (पंचायत समिती औसा व रेणापूर)

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १२ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत लातूर जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१४-२०१५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली. पंचायती राज समितीच्या गटांनी दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ रोजी औसा व रेणापूर या पंचायत समित्यांना भेटी दिल्या त्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २०१४-१५ मध्ये शिक्षण विस्तार अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांनी नियमानुसार किती शाळांना भेटी देऊन तपासणी करणे आवश्यक होते, प्रत्यक्षात त्यांनी किती शाळांना भेटी देऊन शाळांची तपासणी केली, तसेच उक्त तपासणीमध्ये त्यांना कोणत्या त्रुटी आढळून आल्या व त्यांचे निराकरण कशाप्रकारे करण्यात आले, शाळा तपासणीबाबत शिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी यांचे कोष्टक असते. त्यांनी दरवर्षी शाळेला किती भेटी द्याव्यात याचे उद्दिष्ट असते. काही जणांचे उद्दिष्ट साध्य झाले आहे तर काही जणांचे उद्दिष्ट साध्य झाले नाही तसेच भेटी व तपासणी यांची संख्या वेगळी असून त्यात तफावत आहे. शाळांची संख्या १८३ आहे, आवश्यक शाळा भेटीचे उद्दिष्ट १२० आहे, प्रत्यक्ष शाळा भेटीचे साध्य ७६ आहे, शाळा तपासणी उद्दिष्ट १८३ आहे आणि तपासणी प्रत्यक्ष भेटी साध्य १८३ आहे. काहीही समजत नाही. यावर गटविकास अधिकारी, औसा यांनी समितीस विदित केले की, छपाई करताना चूक झालेली आहे व विस्तार अधिकारी यांनी त्यांच्या बीटमधील सर्व शाळांना नियमानुसार ३ भेटी देणे आवश्यक आहे, त्यानुसार त्यांनी सर्व शाळांची तपासणी केली आहे. भेटींचे उद्दिष्ट वेगळे असते व तपासणीचे उद्दिष्ट वेगळे असते. शाळांची तपासणी गट शिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्र प्रमुख यांची मिळून असते. १० टक्के शाळांची तपासणी झाली आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, सविस्तर माहिती पाहिजे. चुकीची माहिती दिली आहे. अधिकारी काम करीत नाहीत. आकडेवारीमध्ये विसंगती दिसून येत आहे. बरोबर काम केले नसेल तर त्यांचा खुलासा मागितला पाहिजे. चुकीचा खुलासा दिलेला आहे. चुकीचा खुलासा देत असतील तर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. अगोदरच सांगितले तर ठीक आहे, क्षमा करता येईल. काहीही माहिती देणे योग्य नाही. पंचायत समितीला गतिमान करायचे आहे. समिती यासाठीच आली आहे. सर्वांचे खुलासे मागवावेत. शाळा भेटी, तपासणी या संदर्भातील सविस्तर माहिती अहवाल समितीला सादर करावा. यावर गटविकास अधिकारी, औसा यांनी समितीस होय असे उत्तर दिले.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, काही शिक्षकांनी वार्षिक नियोजनाप्रमाणे अभ्यासक्रमांची पूर्तता केली नसल्याचे आढळून आले आहे. आपण त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली का, ही गंभीर बाब आहे, आपण त्यांना काय ताकीद दिली, कोणती कारवाई केली याची माहिती दिलेली नाही. यावर गट शिक्षणाधिकारी यांनी अशी माहिती दिली की, जादा तासिका घेऊन अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. यावर समितीने गंभीर त्रुटी आढळूनही कारवाई काहीही केलेली नाही अशी विचारणा केल्यानंतर विभागाने कारणे दाखवा नोटीस दिली आहे. यावर समितीने विचारणा केली की, नोटीसीचे उत्तर दिले आहे का, किती जणांनी उत्तर दिले आहे , काही शिक्षकांनी टाचन नोंदवही परिपूर्ण ठेवल्याचे दिसून आले नाही. दुसऱ्या दिवशी काय करायचे आहे, याचे टाचण करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना शिकविण्याकरिता असे योग्य नाही. त्यांनी अपडेट राहिले पाहिजे. आता सर्व गोष्टी अपडेट झाल्या आहेत का, यावर गट शिक्षणाधिकारी होय असे सांगितले यावर समितीने विचारणा केली की, प्रत्येक शाळेत मुला-मलींसाठी स्वतंत्र शौचालय आहे का आणि पिण्याच्या पाण्याच्या सोयी आहेत का सर्व शाळांची पाहणी केली आहे काय, यावर गट शिक्षणाधिकारी यांनी अशी माहिती दिली की, सर्व शाळांची पाहणी केलेली नाही. मात्र सर्वांना सूचना दिल्या आहेत. यावर समितीने विचारणा केली की, आपण मोघम उत्तरे देऊ नयेत. १० शाळांची अशी स्थिती आहे, १० शाळांची तशी स्थिती आहे, असे आपण सांगितले पाहिजे. आपण विगतवारी ( बायफरकेशन) दिली पाहिजे. सर्व शाळांना शौचालय व पिण्याच्या पाण्याच्या सोयी असल्याच पाहिजेत. आपण नेमकी उत्तरे देत नाही, आपण भेटी दिल्या असत्या तर समजले असते. आम्ही भेटी देणार आहोत. समजा काही शाळांना शौचालय व पिण्याचे पाणी नसेल तर तुम्ही जबाबदार आहात हे लक्षात घ्यावे अशी सूचना केली.

यानंतर समितीने पंचायत समिती, रेणापूर येथे भेट दिली असता तेथील निदर्शनास आढळून आलेल्या बाबीसंदर्भात तत्कालीन गट विकास अधिकारी यांना समितीने विचारणा केली की, काही शाळांमध्ये विद्यार्थी अनुपस्थित दिसून आले होते. काही शाळेतील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद समाधानकारक मिळाला नव्हता. दैनंदिन अध्ययन व अध्यापनात शैक्षणिक संस्थांव्दारे विद्यार्थ्यांप्रति वाव

कमी दिला जात होता. शैक्षणिक साहित्याचा अध्यापनात वापर कमी होता. काही शाळेमध्ये मासिक नियोजनाप्रमाणे अध्यापन केल्याचे दिसून आले नाही. तसेच अहवाल वर्षात गट शिक्षणाधिकारी श्रीमती भंडारी यांनी १२० शाळांना भेटी देणे आवश्यक असताना त्यांनी फक्त ४५ शाळांना भेटी दिल्या तसेच १० शाळांची तपासणी करणे. आवश्यक असताना ५ शाळांची तपासणी केली आहे. त्याचप्रमाणे श्री.होळीकर, शिक्षण विस्तार अधिकारी यांनी १८० शाळांना भेटी देणे आवश्यक असताना १८३ शाळांना भेटी दिल्या २० शाळांची तपासणी करणे आवश्यक असताना १४ शाळांची तपासणी केली. तत्कालीन गट शिक्षणाधिकारी यांनी कामाचे नियोजन केल्याचे दिसून येत नाही. समस्यांचे निराकरण करताना शैक्षणिक साहित्याचा वापर करून अध्यापन करण्याच्या सूचना दिल्या असे नमूद केले आहे. यासंदर्भात खुलासा करण्यात यावा यावर तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, केंद्र प्रमुख यांच्याकडून अहवाल घेऊन त्रुटींचे निराकरण करण्यात आले आहे. समितीने उप शिक्षणाधिकारी यांना विचारणा केली की, ज्या लोकांनी कामे केली नाहीत त्या कर्मचाऱ्यांची पगार देयके (बीले) आपण मंजुर कशी काय केली. ज्या अधिकाऱ्यांनी कामे केली नाहीत त्यांना पगार देय होत नाही. "नो वर्क नो पेमेंट" असे आपणाला करता येते. तसे आपण का केले नाही. तत्कालीन गट शिक्षणाधिकारी यांनी शाळांची तपासणी केलेली नाही. ज्या अधिकाऱ्यांनी कामे केली नाही त्यांचे पेमेंट केल्यामुळे शासनाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे तत्कालीन गट शिक्षणाधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी असे समितीने निदेश दिले यावर तत्कालीन गट शिक्षणाधिकारी यांनी समितीस सांगितले की, ज्या त्रुटी आढळून आल्या त्यामध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. यावर समितीने नाराजी व्यक्त करीत निदेश दिले की, मासिक नियोजनाप्रमाणे अहवाल वर्षात काम पार पाडल्याचे दिसत नाही. शिक्षणाच्या कामात तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी निष्काळजीपणा दाखविल्यामुळे त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे या विषयाबाबत शिक्षण सचिवांची साक्ष घेण्यात यावी अशी समितीने सूचना केली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत माहिती मागविली.**

(१) औसा पंचायत समितीअंतर्गत सन २०१४-२०१५ मध्ये शिक्षण विस्तार अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांनी नियमानुसार किती शाळांना भेटी देऊन शाळांची तपासणी करणे आवश्यक होते व प्रत्यक्षात त्यांनी किती शाळांना भेटी देऊन शाळांची तपासणी केली आहे. यासंदर्भात दिलेल्या लेखी माहितीमधील आकडेवारीमध्ये गंभीर स्वरुपाची विसंगती दिसून येत आहे. त्यामुळे सर्व संबंधितांची उपरोक्त प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधिताची जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा

(२) पंचायत समिती, रेणापूर जि. लातूर अंतर्गत सन २०१४-२०१५ मध्ये शिक्षण विस्तार अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांनी आवश्यकतेपेक्षा कमी शाळांना भेटी दिल्यामुळे शाळांमध्ये कोणकोणते दोष व त्रुटी आढळून आल्या व मासिक नियोजनाप्रमाणे अहवाल वर्षात काम पार न पाडल्याप्रकरणी संबंधित शिक्षण विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी तसेच गट विकास अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्दयासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीच्या भेटीमध्ये औसा पंचायत समिती अंतर्गत गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी यांनी किती शाळांना भेटी देऊन शाळांची तपासणी करणे आवश्यक होते व प्रत्यक्ष किती शाळांना भेटी देऊन शाळांची तपासणी केली आहे, याबाबत दिलेल्या लेखी माहितीमधील आकडेवारीत गंभीर स्वरुपाची विसंगती दिसून येत असल्या प्रकरणी संबंधित तत्कालिन गटशिक्षणाधिकारी श्री यु.एस. कुलकर्णी, तत्कालीन शिक्षण विस्तार अधिकारी श्री कापसे आर.एल., तत्कालिन शिक्षण विस्तार अधिकारी श्री पागे ए.ए. यांना या कार्यालयाने नोटीसीद्वारे खुलासा मागविला होता सदर खुलास्याचे उत्तर प्राप्त झाले असुन त्यात संबंधित गटशिक्षणाधिकारी यांनी प्रति माहे १० भेटी प्रमाणे वर्षातील १२० भेटी शाळांना देणे आवश्यक आहे. असे नमुद केले आहे. तसेच गटशिक्षणाधिकारी यांना प्रत्यक्ष शाळा तपासणीचे निश्चित उद्दीष्ट ठरवून देण्यात आलेले नाही. असे कळवून गटशिक्षणाधिकारी यांनी शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या मार्फत १०० टक्के शाळांची तपासणी करून घेण्याचे असल्यामुळे तालुक्यातील १८३ शाळांपैकी १८३ शाळां तपासणीचे उद्दीष्ट दर्शविण्यात आले होते असा खुलासा केला आहे. भेटीबाबतची सांख्यिकीय माहिती सोबतच्या तक्त्यात जोडण्यात आली आहे. तसेच गटशिक्षणाधिकारी या पदाचा प्रभारी पदभार श्री कापसे यांचेकडे असल्यामुळे त्यांनी समितीस उत्तरे देताना तणावामुळे व्यवस्थीत स्पष्टीकरण देऊ शकले नाही असा खुलासा करून सदर बाब ही क्षमापीत करणे बाबत विनंती केली आहे.

## शाळा भेटी व तपासणी बाबतचा तपशील

| अ.क्र. (१) | अधिकाऱ्यांचे नाव (२) | तालुका/ बीट (३) | शाळांची संख्या (४) | आवश्यक शाळा भेटी उद्दीष्ट (५) | प्रत्यक्ष शाळा भेटी साध्य (६) | शाळा तपासणी उद्दीष्ट (७) | शाळा तपासणी साध्य (८) | शेरा (९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री कुलकर्णी यु. एस. (ग.शि.अ.) | औसा | १८३ | १२० | ७६ | २० | १८ | |
| २ | श्री पागे ए. ए. (शि.वि.अ.) | औसा | ३६ | १०८ | १०५ | ३६ | ३६ | |
| ३ | श्री कापसे आर. एल. (शि.वि.अ.) | सेलु | ३७ | १११ | १०७ | ३७ | ३७ | |
| ४ | श्री पागे ए. ए. (शि.वि.अ.) | टाका | ५७ | १५५ | ८४ | ५७ | ५७ | अतिरिक्त पदभार |
| ५ | श्री कापसे आर. एल. (शि.वि.अ.) | किल्लारी | ५३ | १४० | ७९ | ५३ | ५३ | अतिरिक्त पदभार |

पंचायत समिती, रेणापूर जि. लातूर अंतर्गत सन २०१४-२०१५ मध्ये शिक्षण विस्तार अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांनी आवश्यकतेपेक्षा कमी शाळांना भेटी दिल्यामुळे शाळांमध्ये कोणकोणते दोष व त्रुटी आढळून आल्या व मासिक नियोजनाप्रमाणे अहवाल वर्षात काम पार न पाडल्याप्रकरणी संबंधित तत्कालिन शिक्षण विस्तार अधिकारी, श्री. एस.व्ही. होळीकर व तत्कालिन गट शिक्षणाधिकारी श्रीमती अनुपमा भंडारी यांना या कार्यालयाने दिनांक १२ जुलै २०१९ च्या कारणे दाखवा नोटीसीने खुलासा मागविलेला आहे. त्यानुसार श्री. होळीकर एस.व्ही. शिक्षण विस्तार अधिकारी यांचा खुलासा प्राप्त झाला असून त्यानुसार संबंधितानी सन २०१४-१५ मध्ये एकुण १८३ भेटी दिलेली आहे व त्यांच्या बीट मधील उच्च प्राथमिक शाळांची संख्या १४ असून सदर सर्वच्या सर्व म्हणजेच १४ उच्च शाळांची वार्षीक तपासणी केली आहे. त्यावरून त्यांनी त्याचे कामकाज उद्दीष्ट १०० टक्के पूर्ण केले आहे.

तसेच तालुक्यातील तत्कालिन गटशिक्षणाधिकारी अनुपमा भंडारी यांनी खुलासा दिला असून या पुढे जास्तीत जास्त शाळाभेटी देणेबाबत दक्षता घेतली जाईल असे आश्वासीत केले आहे.

### मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**शालेय शिक्षण विभाग :-** गटशिक्षणाधिकारी यांनी केलेल्या खुलाशाबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे स्वतंत्र अभिप्राय नाहीत.

**ग्राम विकास विभाग :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्द्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली होती. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, समितीला दौऱ्याच्या वेळी अनेक बाबतीत विसंगती निदर्शनास आली. गट शिक्षण अधिकारी व शिक्षण अधिकारी यांनी शाळेला भेटी देऊन तपासणी करणे आवश्यक आहे. समितीला असे आढळून आले की, ते शाळेला भेटी देत नाहीत, तपासणी करीत नाहीत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, गटशिक्षणअधिकारी यांचा जॉब चार्ट आहे. त्यांनी प्रतिमाह १० भेटी याप्रमाणे एका वर्षात १२० शाळांना भेटी देणे अपेक्षित आहे. प्रत्येक वेळी हे शक्य होत नाही. यामुळे विस्तार अधिकाऱ्यामार्फत ते करून घेतात यावर समितीने असे सूचविले की, शाळेतील शैक्षणिक दर्जा सुधारला पाहिजे. अधिकाऱ्यांनी भेट दिली तर दर्जा सुधारण्यास मदत होऊ शकते यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ज्यांनी शाळांना कमी भेटी दिल्या होत्या त्यांना नोटीसेस देण्यात आलेल्या आहेत. तसेच त्यांना भेटींचे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत देखील सूचित केले आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, विभाग प्रमुखांच्या शाळांना नियमित भेटी होण्याच्या अनुषंगाने भविष्यात काळजी घेण्याबाबत शासन स्तरावरुन योग्य त्या उपाययोजना केल्या पाहिजेत. जिल्हा दौऱ्याच्या अनुषंगाने समिती विविध

ठिकाणी भेटी देत असते. बहुतांश ठिकाणी विभाग प्रमुख शाळांना भेटी देत नसल्याचेच निदर्शनास येते. शिवाय शिक्षणाधिकाऱ्यांचे शाळांना भेटी देण्याचे प्रमाण अतिशय कमी असते. मध्यंतरी कोरोना काळ असल्यामुळे भेटी देणे शक्य झाले नाही हे मान्य आहे. परंतु सारासार विचार करता विभाग प्रमुखांच्या शाळांना भेटी देण्याचे प्रमाण फार कमी असते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे म्हणणे आहे की, शिक्षणाधिकारी हे बऱ्याच ठिकाणी त्यांच्या अधिनस्त असलेल्या गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी (शिक्षण) यांना शाळांना भेटी देण्यासाठी पाठवितात. शाळांना कमी भेटी देण्यात येणे हा विषय संपूर्ण राज्याशी संबंधित आहे. यावर विभागीय सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, त्यांनी या बाबतचा आढावा घेतला होता. लातूर जिल्ह्यात विभाग प्रमुखांनी शाळांना भेटी दिलेल्या आहेत. परंतु जे अधिकारी समितीच्या बैठकीला उपस्थित होते त्यांना शाळांना दिलेल्या भेटींचा तपशील समितीसमोर व्यवस्थित मांडता आला नाही. समितीचा मुद्दा बरोबर आहे की, शिक्षणाधिकाऱ्यांच्या शाळांना कमी भेटी होतात. विभागीय सचिवांनी पुढे समितीच्या असेही निदर्शनास आणून दिले की, विभागात मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत. परिणामी शाळांना भेटी देण्याचे उद्दिष्ट साध्य होत नाही. सध्या प्रत्येक अधिकाऱ्यांकडे दोन-तीन पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. तसेच दुसरी बाब अशी की, शाळांना भेटी देण्यासंदर्भात जे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे ते थोड्याफार प्रमाणात कमी करावे लागेल. हे उद्दिष्ट कमी करण्याबाबत विभागाच्या माध्यमातून उचित विचार करण्यात येईल. परंतु नंतर जे काही उद्दिष्ट निश्चित करण्यात येईल तेवढ्या भेटींचे उद्दिष्ट अधिकाऱ्यांनी पूर्ण करणे अपेक्षित आहे. जर त्यांनी उद्दिष्ट पूर्ण केले नाही तर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावरुन संबंधितांवर कारवाई करणे अपेक्षित आहे. अधिकाऱ्यांकडे दोन-तीन पदांचा असलेला अतिरिक्त कार्यभार आणि इतर तदनुषंगिक बाबी लक्षात घेता शाळांना भेटी देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात येईल.यावर समितीने असे मत व्यक्त केले की, बहुतांश अधिकाऱ्यांच्या मुख्यालयाच्या आजूबाजूच्या शाळांना भेटी होतात. परंतु आतील किंवा दुर्गम भागातील शाळांना कमी भेटी देण्यात येतात. दुर्गम भागातील शाळांना अधिकाऱ्यांच्या नियमित भेटी होत नसल्यामुळे त्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण वाढते. या बाबीकडे सुद्धा विभागाने लक्ष दिले पाहिजे. हा केवळ लातूर जिल्ह्यापुरता मर्यादित विषय नसून संपूर्ण राज्याचा विषय आहे. समितीला वाटते की, विभागाने आपल्या धोरणात बदल केला पाहिजे. या बाबतीत शासन स्तरावरुन सूचना दिल्या पाहिजेत किंवा काही तरी धोरण आखावयास पाहिजे. यावर विभागीय सचिवांनी समितीस असा खुलासा केला की, विभागाने या बाबतीत विचार केला आहे. शासनाला सुद्धा काळजी आहे की, अधिकाऱ्यांनी नियमितपणे शाळांना भेटी दिल्या पाहिजेत. विभागातील रिक्त असलेली सर्व पदे भरण्याचा विभागाचा प्रयत्न आहे तसेच दुसरी बाब अशी की, शाळांना भेटी देण्यासाठी शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे शासकीय वाहन नसते. दुसरी बाब अशी की, केंद्र प्रमुख यांच्या अखत्यारीत १२-१५ शाळा असतात. त्यांना काही शाळांना भेटी देण्याचे उद्दिष्ट ठरवून दिल्यास त्यांना फार प्रवास करण्याची गरज लागणार नाही. हा विचार करून केंद्र प्रमुखांना आम्ही शाळांच्या भेटींचे उद्दिष्ट दिले आहे. तालुका स्तरावरील गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी (शिक्षण) हे दुर्गम भागातील सर्व शाळांना भेटी देऊ शकणार नाहीत. कारण त्यांच्याकडे अगोदरच दोन-तीन पदांचा अतिरिक्त कार्यभार असतो आणि शासकीय वाहनही नसते. त्यामुळेच शाळांना भेटी देण्याचे काम केंद्र प्रमुखांकडे सोपविले आहे. सद्यःस्थितीत केंद्र प्रमुखांची पदे पूर्णतः भरण्यात आलेली नसली तरी विभाग ती पदे भरण्याच्या मार्गावर आहे.

तद्नंतर समितीने सचिवांना असे सुचित केले की, केंद्र प्रमुख यांच्या बरोबरच मुख्याध्यापक (उच्चश्रेणी) यांना सुद्धा काही शाळांना भेटी देण्याचे उद्दिष्ट ठरवून दिले तरी त्यांच्याकडून अनेक शाळांना भेटी देणे शक्य होऊ शकते. कारण त्या प्रत्येकाकडे दुचाकी वाहने आहेत. त्यामुळे त्यांना भेटी देण्यात अडचण येणार नाही. यावर विभागीय सचिवानी समितीस विदित केले की, केंद्र प्रमुखांच्या स्तरावर उद्दिष्टानुसार सर्व भेटी झाल्याच पाहिजेत या अनुषंगाने शाळांच्या भेटींसंदर्भातील नियोजन करण्यात येईल. पुढे समितीने असे मत व्यक्त केले की, जर अधिकाऱ्यांनी शाळांना नियमित भेटी देऊन तपासणी केली तर शाळांमध्ये कोणत्या सुविधा आहेत, मुलां-मुलींसाठी स्वतंत्र व्यवस्था आहे काय इत्यादी विविध विषयांच्या बाबतीत माहिती मिळू शकेल. बऱ्याच शाळा इंग्रजकालीन शाळा असून त्या निष्कासित करण्याची वेळ आली आहे. शाळांचा शैक्षणिक दर्जा, तेथील सुविधा या बाबी भेटीच्या अनुषंगाने निदर्शनास येतात व त्यामुळे शिक्षण विषयक कामाला गती मिळते. शहरी भागातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या स्पर्धेत ग्रामीण भागातील विद्यार्थी कुठेही कमी पडता कामा नये, हा समितीचा उद्देश आहे. आपण ग्रामीण भागात डिजीटाईज शाळा करीत आहात. समितीची अपेक्षा एवढीच आहे की, जर अधिकाऱ्यांनी शाळांना नियमितपणे भेटी दिल्या तर शिक्षकांवर काही तरी धाक राहतो. काही ठिकाणी शिक्षकांनी त्यांच्या जागी पदवीधर झालेल्या मुलांना पर्यायी शिक्षक म्हणून ठेवले आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, जर अशाप्रकारे पर्यायी शिक्षक ठेवण्याचा प्रकार घडला असेल तर तातडीने संबंधित शिक्षकांवर कारवाई करणे अपेक्षित आहे.

समितीने असे निदर्शनास आणून दिले की, ज्या शिक्षकांनी पर्यायी शिक्षक ठेवले आहेत त्यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांना सेवेतून कायमस्वरुपी बडतर्फ केले पाहिजे. यावर विभागीय सचिवांनी समितीस ठीक आहे असे आश्वासन दिले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १२ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत लातूर जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-२०१५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जिल्हा परिषदेकडून सादर करण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने औसा व रेणापूर या पंचायत समित्यांना भेटी दिल्या. सदरहू भेटीच्यावेळी औसा पंचायत समिती अंतर्गत असलेल्या गट शिक्षणाधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी यांना नियमानुसार शाळांना भेटी देऊन तपासणी करण्याचे देण्यात आलेले उद्दिष्ट व प्रत्यक्षात त्यांनी शाळांना भेटी देऊन तपासणी केल्याबद्दलची माहिती, तसेच उक्त तपासणीमध्ये त्यांना आढळून आलेल्या त्रुटी व सदर त्रुटींचे केलेले निराकरण याबाबतच्या सांख्यिकीय माहितीमध्ये तफावत आढळून आली. तसेच काही शिक्षकांनी वार्षिक नियोजनाप्रमाणे अभ्यासक्रमांची पूर्तता केलेली नसून टाचन नोंदवही परिपूर्ण ठेवलेली नाही. नियमित शाळांना भेटी दिल्या नसल्याने विद्यार्थ्यांना शौचालय व पिण्याच्या पाण्याच्या सोयीसह अन्य सुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे, याबाबतची माहिती देखील अधिकाऱ्यांना समितीस देता आली नाही.

रेणापूर, पंचायत समिती अंतर्गत शाळांमध्ये विद्यार्थी अनुपस्थित दिसून आले, काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रतिसाद समाधानकारक मिळाला नाही, दैनंदिन अध्ययन व अध्यापनात शैक्षणिक संस्थांव्दारे विद्यार्थ्यांप्रति वाव कमी दिला जात होता, शैक्षणिक साहित्याचा अध्यापनात वापर कमी होता व मासिक नियोजनाप्रमाणे अध्यापन केल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच अहवाल वर्षात गट शिक्षणाधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी यांनी उद्दिष्टानुसार शाळांना भेटी देऊन तपासणी केली नव्हती.

शासन निर्णयानुसार गट शिक्षणाधिकारी यांनी दरमहा किमान १० प्रमाणे अहवाल वर्षात १२० शाळांना व शिक्षण विस्तार अधिकारी यांनी बिटातील सर्व शाळांना भेटी देऊन शैक्षणिक व वार्षिक तपासणी करणे अनिवार्य असताना औसा व रेणापूर पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यानुसार कामाचे नियोजन केले नसल्याने व लेखी माहितीमधील आकडेवारीतील विसंगती यासह अन्य आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने समितीने तीव्र नाराजी व्यक्त करून संबंधितांचे खुलासे मागवून घ्यावेत व शाळांच्या भेटी आणि तपासणी संदर्भातील सविस्तर माहिती समितीला सादर करावी असे समितीने निदेश दिले.

त्याअनुषंगाने मासिक नियोजनाप्रमाणे अहवाल वर्षात काम पार न पाडल्याप्रकरणी औसा पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी श्री.यु.एस.कुलकर्णी, शिक्षण विस्तार अधिकारी श्री.आर.एल.कापसे व श्री.ए.ए.पागे यांचे आणि रेणापूर पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी श्रीमती अनुपमा भंडारी व शिक्षण विस्तार अधिकारी श्री.एस.व्ही.होळीकर यांचे खुलासे घेण्यात आले व शाळा भेटी व तपासणी बाबतचा सविस्तर तपशिल समितीस सादर करण्यात आला.

**पंचायत समित्यांचे बहुतांश अधिकारी मुख्यालयाच्या आजूबाजूच्या शाळांना भेटी देतात परंतु आतील किंवा दुर्गम भागातील शाळांना कमी भेटी देतात. या भागातील शाळांना अधिकाऱ्यांच्या नियमित भेटी होत नसल्यामुळे त्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण वाढते. अधिकाऱ्यांनी मासिक नियोजनाप्रमाणे अहवाल वर्षात शाळांना भेटी दिल्यास विद्यार्थ्यांना स्वतंत्र शौचालय व पिण्याच्या पाण्याच्या सोयीसह अन्य सुविधा उपलब्ध आहेत काय, याबाबतची माहिती त्यांना मिळू शकेल व त्यानुसार योग्य ती कार्यवाही केल्यास शाळांचा शैक्षणिक दर्जा व विद्यार्थ्यांची बौध्दीक क्षमता सुधारून शहरी भागातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या स्पर्धेत ग्रामीण भागातील विद्यार्थी कुठेही कमी पडणार नाहीत असे समितीचे मत आहे.**

**समितीला अन्य एका जिल्ह्यातील दौऱ्याच्यावेळी शिक्षकांनी पर्यायी शिक्षक म्हणजेच एक प्रकारे त्या शिक्षकांनी कंत्राटी पध्दतीवर शिक्षक नेमल्याचे निदर्शनास आले होते. सदरहू बाब अतिशय गंभीर स्वरूपाची असल्याने अधिकाऱ्यांच्या शाळा भेटी व तपासणीमध्ये राज्यातील कोणत्याही शाळांमध्ये शिक्षकांनी पर्यायी शिक्षक ठेवल्याचे निदर्शनास आले तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांना सेवेतून कायमस्वरूपी बडतर्फ करणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या कार्यपध्दतीला आळा घालण्यासाठी शासनाने योग्य ती कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**तसेच ग्रामीण भागातील शाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी त्या विद्यार्थ्यांना अत्यावश्यक सोयी सुविधा नियमित मिळाव्यात, अध्यापनासाठी विद्यार्थी संख्येप्रमाणे शैक्षणिक साहित्य, क्रीडा साहित्य व ग्रंथालयातील पुस्तके विहित वेळेत मिळावीत. शाळेतील अन्य त्रुटींचे निराकरण व्हावे यासाठी गट शिक्षणाधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी यांनी शासन निर्णयानुसार अहवाल वर्षात दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे शाळांना भेटी व तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, याप्रकरणी जिल्हा परिषदेतील गट शिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी (शिक्षण) यांनी सर्वच शाळांमध्ये भेटी व पाहणी तसेच तपासणीमध्ये अत्यंत निष्काळजीपणा केला असून उक्त अधिकाऱ्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात पाठवावा अशी समितीची शिफारस आहे.**

**तसेच या कामात निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर वेळच्या वेळी तात्काळ कारवाई होणेही आवश्यक आहे. यास्तव शाळांना भेटी व तपासणी याबाबतचे कामकाज ग्रामीणस्तरावर उद्दिष्टाप्रमाणे होत आहे काय, याबाबतची तपासणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली शासनस्तरावरून होण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व त्या दृष्टीने कडक स्वरुपाच्या सूचना संबंधितांना निर्गमित करण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण दोन

**जिल्हा परिषद, लातूर**

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, करजगांव येथील शौचालयाच्या दुरावस्थेबाबत**

**(पंचायत समिती, औसा)**

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १२ सप्टेंबर,२०१८ या कालावधीत लातूर जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१४-२०१५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, करजगाव, तालुका औसा येथे समितीने भेट देऊन पाहणी केली असता समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींच्या अनुषंगाने शाळेचे मुख्याध्यापक यांना समितीने पुढीलप्रमाणे निदेश दिले की, शाळेच्या ठिकाणी योजनेंतर्गत येणारे धान्य मोजून घेण्यासाठी वजनकाटा ठेवावा. समितीच्या असेही निदर्शनास आले की, शाळेतील मुले व मुली यांना गुणाकार करता आला, त्यांनी समितीने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली यावरून मुलांची गुणवत्ता चांगली आहे. तसेच किचन शेड जुने झाले असुन बाहेरच्या बाजूला साधे शेड टाकून जेवण शिजविले जात आहे, समितीच्या असे निदर्शनास आले की, मुलांच्या शौचालयाची अत्यंत दुरवस्था, दुर्दशा झाली आहे, शौचालयाला दरवाजा नाही, पाण्याची अडचण आहे, अत्यंत अस्वच्छता आहे. समितीने सदर बाबतीत नाराजी व्यक्त करून लवकरात लवकर या संदर्भात कार्यवाही करण्याची सूचना केली. तसेच मुलांची गुणवत्ता अजून वाढविण्याचा प्रयत्न करावा असे समितीने मुख्याध्यापक यांना सांगितले, तसेच महत्त्वाचे म्हणजे, मुख्याध्यापक कार्यालयात माननीय राष्ट्रपती व माननीय पंतप्रधान यांचे फोटो लावण्यात यावेत असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत माहिती मागविली.**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, करजगाव तालुका औसा या शाळेमधील शौचालयाची अत्यंत दुरावस्था झाली असून शौचालयाला दरवाजा नसणे, पाण्याचा अभाव अत्यंत अस्वच्छता असणे, स्वयंपाक खोली अत्यंत जुनी असणे, स्वयंपाक गृहासाठी बाहेरील बाजूला शेड टाकून अन्न शिजविण्यात येणे या सर्व अव्यवस्थे प्रकरणी संबंधितांची जबाबदारी निश्चित करून शौचालय व स्वंयपाक गृह सुव्यवस्थित करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा ?

**उपरोक्त मुद्दयासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समिती यांच्या भेटी मध्ये दिनांक ११/०९/२०१८ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करजगांव येथील शाळेच्या शौचालयाची अत्यंत दुरावस्था निदर्शनास आलेली होती. तसेच या शौचालयास दरवाजा नसणे, शौचालयात पाण्याचा अभाव असणे, अत्यंत अस्वच्छता असणे, स्वयंपाक खोली अत्यंत जुनी असणे, स्वयंपाक गृहासाठी बाहेरील बाजूला शेड टाकून अन्न शिजविण्यात येणे या सर्व अवस्थेप्रकरणी या कार्यालयाने मुख्याध्यापक जि.प. प्रा.शा. करजगांव ता. औसा यांना दिनांक १२/०७/२०१९ च्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली असून महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६४ अंतर्गत कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच सद्यःस्थितीत या शाळेचे शौचालय व स्वयंपाक गृह सुस्थितीत असले प्रकरणी गटशिक्षणाधिकारी यांचे मार्फत अहवाल मागविलेला असून सदर अहवालाच्या आधारे या शाळेस मुलां-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध आहे, शौचालयास दरवाजा उपलब्ध आहे, पाण्यासाठी कट्टा टाकी उपलब्ध आहे, स्वयंपाकासाठी किचन शेड उपलब्ध आहे, सदरची शाळा धुरमुक्त करण्यात आलेली आहे. मध्यान्ह भोजन तयार करताना सर्व प्रकारच्या स्वच्छता बाबत काळजी घेण्यात येते. स्वयंपाकासाठी गॅस उपलब्ध असून गॅसवर स्वयंपाक केला जातो. सोबत फोटो सलग्न करण्यात आला आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**ग्राम विकास विभाग :-** जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा

परिषद, प्राथमिक शाळा, करजगाव, ता. औसा येथील शौचालयाच्या दुरावस्थेबाबत विचारणा केली की या शौचालयाला दरवाजा नसणे, पाण्याचा अभाव असणे, स्वयंपाक खोली जुनी असणे, आदिंबाबत समितीने चौकशी करून अहवाल देण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार आपण चौकशी करून चौकशी अहवालात असे नमूद केले आहे की, सर्व सुस्थितीत आहे व त्या ठिकाणचे फोटो देखील सोबत जोडले आहेत. त्याचप्रमाणे असेही सांगण्यात आले आहे की, महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ अंतर्गत कार्यवाही करण्यात येत आहे. या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ते समितीला विषद करावे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला होय असे उत्तर देऊन पुढे विदित केले की, उक्त शाळेत मुलां-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध असून त्यांना दरवाजे लावण्यात आलेले आहेत. तसेच पाण्यासाठी कट्टा टाकी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याबरोबरच किचन शेड उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. यावर समितीने होकारात्मक संमती दर्शवली.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १२ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत लातूर जिल्हा परिषदेस भेट दिली. सन २०१४-२०१५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जिल्हा परिषदेकडून सादर करण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने, समितीने औसा तालुक्यातील करजगांव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देऊन पाहणी केली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, “या शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता चांगली आहे. परंतु या शाळेतील शौचालयाची अत्यंत दुरावस्था झाली असून शौचालयाला दरवाजा नसणे, पाण्याचा अभाव, अत्यंत अस्वच्छता असणे, स्वयंपाक खोली अत्यंत जुनी असणे, स्वयंपाक गृहासाठी बाहेरील बाजूला शेड टाकून अन्न शिजविण्यात येणे.” या सर्व अव्यवस्थे प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यात यावी व शौचालय आणि स्वंयपाक गृह तातडीने सुव्यवस्थित करण्यात यावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा, असे समितीने निदेश दिले.

त्यानुसार करजगांव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या अव्यवस्थेला जबाबदार असणाऱ्या संबंधित मुख्याध्यापक यांना दिनांक १२ जुलै, २०१९ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली असून महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६४ अंतर्गत कार्यवाही करण्यात येत असल्याचे व शाळेचे शौचालय आणि स्वयंपाक गृह सुस्थितीत करण्यात आले असून पाण्यासाठी कट्टा टाकी व स्वयंपाकासाठी किचन शेड उपलब्ध करून देण्यात आले असल्याची माहिती समितीस विभागीय सचिवांच्या साक्षीत सचिवांकडून देण्यात आली.

**करजगांव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक त्या सोयी सुविधा तातडीने उपलब्ध करून दिल्याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे. तथापि, शौचालयासंदर्भातील अस्वच्छता, पाण्याची असुविधा, स्वयंपाकगृहाची अस्वच्छता शाळेच्या परिसरातील अस्वच्छता इत्यादिबाबत जिल्हा परिषदेने कोणतीही कारवाई न करता व संबंधितांना कारवाईशिवाय संरक्षण दिले असल्यामुळे समिती या प्रकरणी नाराजी व्यक्त करते. तसेच याप्रकरणी जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सोयी सुविधा मिळण्याच्या कामात निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित शिक्षक व मुख्याध्यापकावर कारवाई होणे आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे. यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६४ अंतर्गत संबंधित शिक्षक व मुख्याध्यापकावर करण्यात येत असलेली कार्यवाही तातडीने पूर्ण करून योग्य ती कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**याच अनुषंगाने समितीला राज्यात भेटी देत असताना अनेक शाळांमध्ये शौचालयाची दुरावस्था झाल्याचे आढळून आले आहे. विशेषतः मुलींच्या शौचालयाची स्थिती अत्यंत वाईट आहे. शौचालयाची स्थिती चांगली नसल्याने मुलींना शौचालयाचा वापर करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, शौचालय अस्वच्छ असणे, त्यात पाण्याची व्यवस्था नसणे तसेच ते सुरक्षितरित्या बांधलेले नसणे त्यामुळे अशा शाळांतील शौचालयांचा आढावा घेऊन ते सुस्थितीत व मुलींना वापरण्यायोग्य करण्याबाबत त्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनाने योग्य ती कार्यवाही करावी, अशीही समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावी.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, लातूर

## शालेय पोषण आहार गोडाऊन (ता. शिरुर अनंतपाळ) येथे आढळून आलेली अनियमितता तसेच शालेय पोषण आहार करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग झाल्याबाबत.

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १२ सप्टेंबर २०१८ या कालावधीत लातूर जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१४-२०१५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने दिनांक ११ सप्टेंबर २०१८ रोजी शालेय पोषण आहार गोदाम (गोडाऊन), लातूर येथे भेट देऊन पाहणी केली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, तेथे जे पुरवठादार कर्मचारी होते त्यांच्याकडे ओळखपत्र नव्हते. गोडाऊनमधील माल प्रयोगशाळेमध्ये (लॅब) तपासण्यासाठी पाठविण्यात येतो असे सांगण्यात आले. तेथे उच्चदर्जाच्या (ग्रेडवन) मालाचे (सॅम्पल) नमुने नाहीत. श्रेणी (ग्रेड) तपासणीसाठी गोडाऊनमध्ये चाळणी नाही. करारनाम्याची प्रत गोडाऊनमध्ये नाही. करारनाम्याप्रमाणे गोडाऊनमध्ये वजनकाटा उपलब्ध पाहिजे तो नाही. माती मिश्रीत मटकी आढळून आली आहे. गोडाऊनमधील मालावर शालेय पोषण आहार, महाराष्ट्र शासन असा मजकूर लिहिलेला नाही. करारनाम्यातील अटीचे पालन करण्यात आलेले नाही. जिल्हापरिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्यांनी गोडाऊनला भेट दिलेली नाही. तेथील स्टॉकबुक छापील व प्रमाणित नाही. गोडाऊनमधील तांदूळाची तपासणी केली असता तो एकसारखा आढळून आलेला नाही. गोडाऊनमध्ये माल आल्यानंतर ५ दिवसात त्याचे वाटप झाले पाहिजे, परंतु १० ते १२ दिवसांपासून सदर माल गोडाऊनमध्ये पडून होता. प्रयोगशाळेने माल रद्द केल्यास तो माल पाच दिवसात परत करावयाचा असतो, अशा सर्व अटींचे पालन करण्यात आलेले नाही. करारनाम्यातील कोणत्याही अटीचे पालन केले जात नाही असे समितीच्या निदर्शनास आले. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

तद्नंतर समितीने निदर्शनास आलेल्या बाबींच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे निदेश दिले की, मध्यवर्ती गोडाऊनमधून मालाचा पुरवठा होतो. त्या गोडाऊनमधून मालाचा पुरवठा शाळांना झाल्यानंतर मालाचा नमुना तपासणीसाठी पाठविला पाहिजे. गोडाऊनमधून टेस्ट लॅबमध्ये मालाचे सॅम्पल तपासणीसाठी पाठविण्यात येते. टेस्टलॅबकडे जाणारे सॅम्पल वेगळे व शाळेकडे जाणारा माल वेगळा असतो अशी परिस्थिती आहे. सर्व मालसाठा ग्रेडवनचा पाहिजे. परंतु शाळांमध्ये नमुने आढळून आले नाहीत. जो नमुना शाळेत पाहिजे तोच नमुना गोडाऊनमध्ये पाहिजे. त्याच दर्जाचा, त्याच नमुन्याचा माल शाळांना दिला पाहिजे. मात्र असे होताना कुठेही आढळून आले नाही. २५ टक्के माल चाळणीतून खाली पडला तर तो माल पास होतो, मात्र २५ टक्क्यांपेक्षा जास्त माल चाळणीतून खाली पडला तर तो पास होत नाही. गोदामात चाळण्या नव्हत्या. समितीला भेटीच्या वेळी मातीमिश्रीत मटकी आढळून आली. करारात असणाऱ्या ३५ अटींमध्ये स्पष्ट दिले आहे की, मालाच्या प्रत्येक पोत्यावर अद्ययावत असा शालेय पोषण आहार असल्याबाबतचा शिक्का असला पाहिजे. कारण त्या मागचा शासनाचा उद्देश असा आहे की, हा माल बाहेर मार्केटमध्ये विकण्यासाठी जावू नये, मग त्या मालामध्ये तेल असो, हळद असो, त्या मालावरही ठळक अक्षरात शिक्का पाहिजे. मात्र कोणत्याही मालावर तसा शिक्का कुठेही आढळला नाही. पुरवठादाराच्या माणसाकडे ओळखपत्र नव्हते. ओळखपत्र नसेल तर तोच अधिकृत माणूस आहे हे कसे समजायचे हा प्रश्न निर्माण होतो. आजपर्यंत त्या गोदामाला कोणत्याही अधिकाऱ्यांनी भेट दिली नाही. गोदामाचे व्हिजिट बुक कोरे होते. स्टॉक बूकही छापील फॉर्मटमध्ये नव्हते आणि प्रमाणितही नव्हते. कोणत्या मालाचा साठा किती आहे हे समिती येणार आहे म्हणून हाताने लिहिले होते. मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आहे. समितीने या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना आदेश दिले की, या संदर्भात त्यांनी स्वतः चौकशी करावी आणि १ महिन्याच्या आत या संदर्भातील अहवाल समितीला द्यावा, तसेच या विषयाच्या संदर्भात विभागाच्या सचिवांची साक्ष लावण्यात यावी, संबंधितांचे कॉंट्रॅक्ट रद्द करण्यात यावे.

समितीला भेटीच्या वेळी पाहणी करताना आढळलेल्या त्रुटींसंदर्भात समितीने पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले की, करारनाम्यातील अटी व शर्ती यांचा भंग झाला आहे. करारनाम्यातील अटी व शर्ती यांच्या अनुषंगाने हा विषय आला आहे. शासनासोबत करारनामा केला आहे. करारनाम्यातील अटी व शर्ती यांचा भंग गोदामात केला असल्याचे दिसून आले आहे. ट्रकमध्ये वजनकाटे असले पाहिजेत. मात्र कोणत्याही ट्रकमध्ये वजनकाटे दिसून आले नाहीत. मुख्याध्यापकांकडे वजनकाटा असणे अभिप्रेत नाही. ट्रकमध्ये वजनकाटा असला पाहिजे. मुख्याध्यापक लहान माणूस आहे, कॉंट्रॅक्टर मोठा माणूस आहे. ४५ किलो तांदळाचे पोते ५० किलो

असल्याचे सांगून दिले तरी मुख्याध्यापक स्वीकारतो. कारण तो लहान माणूस आहे. कारवाई शेवटी लहान माणसांवरच होते. ट्रकवर शालेय पोषण आहार असल्याचा मोठा फलक असला पाहिजे. करारनाम्यात १ ते ४२ अटी व शर्ती आहेत. पुरवठादाराने कोणत्या अटी व शर्ती यांचा भंग केला आहे हे गोदामात गेल्यावर समितीच्या लक्षात आले. त्यानुसार करारनाम्यातील एकाही अटी व शर्ती याचा भंग केला तर संबंधित कारवाईस पात्र आहे. विभागाने संबंधितावर कारवाई करायची आहे.

यावर प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीला विदित केले की, समितीने सांगितलेले योग्य असून सत्य आहे. सर्व परिस्थिती सत्य असून या संदर्भात संबंधित ठेकेदाराची चौकशी करून कारवाई करण्यात येईल. असे समितीला आश्वासन दिले. यावर समितीने नाराजी व्यक्त करीत विचारणा केली की, जिल्हा परिषद प्रशासनाची या संदर्भात काही जबाबदारी आहे की नाही, तुम्ही इतके दिवस काय करीत होता, तुम्हाला गोदाम माहीत होते. तुमच्या माणसाचे गोदाम होते. तुम्हीच नेवून गोदाम दाखविले. तुम्ही भेट का दिली नाही, तिकडे जाऊन पाहू अशी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना विनंती का केली नाही, तुम्ही आता कारवाई करण्याबाबत सांगत आहात. तुम्ही कारवाई करणारे कोण आहात, तुम्हाला त्या गोदामावर कारवाई करण्याचा काय अधिकार आहे, कारवाई करतो असे कोणत्या अधिकारात तुम्ही म्हटले आहे, यावर प्रभारी शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी आम्ही संचालकांकडे या संदर्भातील प्रस्ताव प्रस्तावित करतो असे समितीला उत्तर दिले.

यावर समितीने असे निदेश दिले की, जिल्हा स्तरावर शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा, शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक अशी आहे. ते दोघेही या बाबीशी संबंधित आहेत आणि त्यांच्यावर लक्ष देण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची आहे. शासनासोबत जरी करारनामा झाला असेल तरी कार्यान्वयीन यंत्रणा शिक्षण विभाग, जिल्हा परिषद आहे आणि त्यावर मुख्य कार्यपालन अधिकारी आहेत. तुम्हाला करारनामा रद्द करण्याचा अधिकार नसला तरी करारनाम्यातील अटी व शर्ती यांचा भंग झाला म्हणून करारनामा रद्द करण्याची शिफारस करण्याची जबाबदारी तुमची आहे. अधीक्षक, शालेय पोषण आहार असे जिल्ह्याला वर्ग-१ चे पद असते. सदर बाबतीत त्यांची जबाबदारी असते. कारण ते विशेष पद दिलेले असते. तसेच विभाग प्रमुखांनी एकही भेट दिलेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची एकही भेट नाही. टीए,डीए मिळत नाही म्हणून मुख्यालयाच्या पंचायत समितीला भेट दिली जात नाही असे लक्षात येत आहे. अधिकाऱ्यांचे या संदर्भात काय मत आहे  यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही समितीच्या आक्षेपांबाबत आम्ही गेलो होतो अशी पुष्टी जोडली. समितीने आक्षेप घेतले आहेत. गंभीर चुका आहेत. परिस्थिती चांगली नाही. वाईट परिस्थिती आहे. सन २०११-१२ च्या करारनाम्यातील ४२ अटी व शर्ती आहेत, त्यांचे कोणतेही पालन केले जात नाही असे निदर्शनास आले आहे.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असे निदेशित केले की, समिती  हे सर्व रेकॉर्डवर घेत आहे. शालेय पोषण आहाराच्या संदर्भात जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर गोदामे आहेत. पंचायती राज समितीच्या गटाने गोदामाची पाहणी केली आहे, त्यावेळी उपस्थित संबंधित अधिकाऱ्यांनीही पाहणी केली आहे आणि त्यांनाही दिसून आले आहे की, करारनाम्यातील अटी व शर्ती यांचा भंग झाला आहे. त्रुटी तसेच अटी व शर्ती यांचा भंग समितीच्या निदर्शनास आला आहे आणि तसा अहवालही तयार झाला आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मुख्य म्हणून सर्व बाबी पाहिल्या पाहिजेत. आपली भेट (व्हिजिट) झालेली नाही. गोदामाच्या संदर्भात ज्या काही अनियमितता आहेत, त्या संदर्भात तात्काळ तपासणी करून त्रुटींच्या संदर्भात कारवाई करण्याच्या संदर्भातील प्रस्ताव तयार केला पाहिजे. संपूर्ण राज्यात शालेय पोषण आहाराचे धान्य शाळांत पोहचत नाही, विद्यार्थ्यांना धान्य मिळत नाही, धान्याची तपासणी होत नाही, करारनाम्याच्या प्रती सदर ठिकाणी राहत नाहीत, चांगल्या दर्जाचे धान्य राहत नाही, तपासणीच्या संदर्भात फलक लागले पाहिजेत, तेही लागत नाहीत, हे योग्य नाही.

तुमची मागणी हजार क्विंटल तांदळाची असेल तर त्या पुरवठा केलेल्या धान्याच्या पोत्यांवर शालेय पोषण आहार असे लिहिले आहे का, मागणीप्रमाणे धान्य आले आहे का, हे पाहण्यासाठी गट शिक्षणाधिकारी किंवा शालेय पोषण आहार अधीक्षक यांनी गोदामात जावून तपासणी केली आहे का, असे कधीही झालेले नाही. शिक्के मारले असते तर गैरप्रकार होण्याचे प्रकार फार कमी झाले असते. शिक्के यासाठी मारले जात नाहीत, कारण तेवढ्या मालाची आवश्यकता लागत नाही, तो बाहेर विकला जातो. हे बरोबर नाही. हा गंभीर विषय आहे. आपण व्यवस्था सुधारली पाहिजे. तपासणी अहवाल कुठेही दिसलेला नाही. पंचायत समितीच्या अधीक्षकांकडेही तसा अहवाल नाही. तपासणीसाठी तुमची टीम असते, यंत्रणा असते, मात्र तपासणी करून तपासणी अहवाल तयार केला आहे असे काहीही दिसलेले नाही.

छापील स्टॉक बूक नाही, असलेले पुस्तक प्रमाणित नाही, सदर बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तात्काळ चौकशी करावी, ज्या गोष्टी नव्याने करायच्या असतील त्या कराव्यात, आपण ही प्रक्रिया १५ दिवसांच्या आत पूर्ण करावी. सदर बाबींसाठी जे अधिकारी संबंधित आहेत, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून आपल्यावरही ती जबाबदारी आहे, तसेच कनिष्ठ अधिकाऱ्यांवर देखील ती जबाबदारी आहे. संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी. दोषींवर कारवाई प्रस्तावित करून तत्संदर्भातील अहवाल १ महिन्याच्या आत समितीला सादर करावा. संपूर्ण राज्यात असे प्रकार मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे विभागाच्या सचिवांची साक्षही लावण्यात येत आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत माहिती मागविली.**

(१) शालेय पोषण आहार गोडाऊन लातूर येथील पुरवठादार कर्मचाऱ्यांकडे ओळखपत्र नसणे, उत्तम दर्जाच्या मालाचे नमुने नसणे, करारनाम्याची प्रत गोडाऊनमध्ये उपलब्ध नसणे, मातीमिश्रीत मटकी आढळून येणे, जिल्हा परिषदेमधील कोणत्याही अधिकाऱ्यांनी गोडाऊनला भेट दिलेली नसणे साठा पुस्तक छापील व प्रमाणित केलेले नसणे, तांदळाची प्रतवारी एकसारखी आढळून न येणे, गोडाऊनमध्ये आलेला माल १० ते १२ दिवस तसाच पडून असणे, उपरोक्त अनियमिततेप्रकरणी सखोल चौकशी करून संबंधिताची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय त्यानुसार संबंधितावर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा?

(२) लातूर येथील शालेय पोषण आहाराच्या गोडाऊन मधील मालाच्या संदर्भात करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग झाल्या प्रकरणी चौकशी करण्यात येऊन संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, असल्यास संबंधितांवर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा ?

**उपरोक्त मुद्दयासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीने शालेय पोषण आहार योजने अंतर्गतच्या गोडाऊनला दिनांक ११/०९/२०१८ रोजी प्रत्यक्ष भेट दिली असता शालेय पोषण आहार गोडाऊन लातूर येथील पुरवठादार कर्मचाऱ्यांकडे ओळखपत्र नसणे,उत्तम दर्जाच्या मालाचे नमुने नसणे, करारनाम्याची प्रत गोडाऊनमध्ये उपलब्ध नसणे, मातीमिश्रीत मटकी आढळून येणे, जिल्हा परिषदेमधील कोणत्याही अधिकाऱ्यांनी गोडाऊनला भेट दिलेली नसणे साठा पुस्तक छापील व प्रमाणित केलेले नसणे, तांदळाची प्रतवारी एकसारखी आढळून न येणे, गोडाऊनमध्ये आलेला माल १० ते १२ दिवस तसाच पडून असणे, अशा बाबी निदर्शनास आल्या होत्या या बाबत या कार्यालयाने कारणे दाखवा नोटीसीने श्री एम.पी. भुतडा शालेय पोषण आहार पुरवठादार जि. लातूर यांना खुलासा सादर करणे बाबत कळविलेले आहे. तसेच या कार्यालयाने शालेय पोषण आहार गोडाऊन तपासणीबाबत व तेथील अनियमीततेची चौकशी करणे बाबत समिति नियुक्त केलेली होती. सदर समितीच्या अहवालानुसार (१) सदरील गोडाऊन येथे भेट दिली असता. पुरवठादार यांच्या कर्मचा-यांकडे ओळखपत्र आढळून आले. (२) भेटीच्या दरम्यान शिक्षण संचालक (प्रा.) महाराष्ट्र राज्य पुणे व मे.एम.पी. भुतडा नियुक्त पुरवठादार, शालेय पोषण आहार योजना-जिल्हा लातूर यांच्यातील करारनामा दि. १४ फेब्रुवारी २०१९ चा दिसुन आला. (३) गोडाऊनमधील धान्यादीमाल साठा सुस्थितीत दिसून आला. (४) गोडाऊनमध्ये तांदुळ व धान्यादी मालाचे प्रमाणीत केलेले नोंदणी रजिस्टर आढळून आले. (५) शाळेवर माल पुरवठा करण्यापूर्वी संबंधित गटशिक्षणाधिकारी व मुख्याध्यापक यांना गाडी नंबर व वाहन चालकाचे नाव व मोबाईल नंबर व संबंधित गाडीचा मार्ग कळविला जात असल्याचे दिसून येते. (६) गोडाऊन मध्ये उपलब्ध असलेल्या मटकीमध्ये माती दिसुन आली नाही. (७) शिक्षणाधिकारी (प्रा.) व शालेय पोषण आहार अधीक्षक यांनी भेटी दिलेल्या आहेत. (८) भारतीय अन्न महामंडळाकडून प्राप्त झालेल्या तांदुळाची सिलबंद पोती गोडाऊमध्ये दिसून आली. (९) डिजीटल वजन काटा सर्व वाहनांमध्ये वापरात असल्याचे दिसून आले. (१०) भेटीच्या दरम्यान शिक्षण संचालक (प्रा.) महाराष्ट्र राज्य पुणे व मे.एम.पी. भुतडा नियुक्त पुरवठादार, शालेय पोषण आहार योजना-जिल्हा लातूर यांच्यातील करारनामा दि. १४ फेब्रुवारी २०१९ चा दिसुन आला. व करारातील सर्व बाबींचे अनुपालन केले जात असल्याचे निदर्शनास आले.

तसेच या कार्यालयाने दिनांक १३ मे २०१९ च्या परिपत्रका अन्वये सर्व ग.शि.अ. व ए.पी. भुतडा यांना आदेश देऊन शालेय पोषण आहार अंतर्गत सुव्यस्थित रित्या कामकाज करण्यासाठी सुचना देण्यात आलेल्या आहेत.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :—**शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ग्रामीण भागात धान्यादी मालाचा पुरवठा करणे व शहरी व ग्रामीण भागात तांदूळ वाहतूक करण्यासाठी ई-निविदा प्रक्रियेव्दारे जिल्हानिहाय पुरवठेदारांची नियुक्ती करण्यात येते. सदर पुरवठेदारासोबत प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत करारनामा करण्यात येतो. सदर करारनाम्याची प्रत सर्व शाळांना उपलब्ध

करून देण्यात येते. प्रस्तुत करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार शाळांना धान्यादी मालाचा पुरवठा करणे पुरवठेदारास बंधनकारक आहे. पुरवठेदाराच्या अधिकृत कर्मचा-यांकडे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी प्रमाणित केलेले ओळखपत्र असणे करारनाम्यातील तरतूदीनुसार बंधनकारक आहे ओळखपत्र नसणारी व्यक्ती आढळून आल्यास पुरवठेदारावर रु. ५,००० इतक्या दंडात्मक रक्कमेची तरतूद आहे. त्यानुसार संबंधित पुरवठेदारावर चौकशी करून कारवाई करण्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना कळविण्यात आले आहे. पुरवठेदाराने शाळा स्तरावर पुरवठा केलेला धान्यादी माल प्रथमदर्शी निकृष्ट दर्जाचा आढळल्यास तो ७ दिवसामध्ये पुरवठेदाराने बदलून देणे बंधनकारक आहे. सदर माल पुरवठेदाराने बदलून न दिल्यास प्रस्तुत मालाची खरेदी खुल्या बाजारातून करण्यात येते व त्यासाठी येणारा अतिरिक्त खर्च पुरवठेदाराच्या देयकातून वसूल करण्याची तरतूद करारनाम्यामध्ये आहे. तसेच, पुरवठा केलेल्या मालाची ऐच्छिक पध्दतीने प्रयोगशाळा तपासणी करण्यात येते. प्रयोगशाळा तपासणीमध्ये प्रस्तुत धान्यादी मालाचे नमूने FSSA मधील तरतूदीनुसार पात्र ठरल्यानंतरच प्रस्तुत धान्यादी मालाची देयके अदा करण्यात येतात. पुरवठेदाराने गोदामामध्ये तांदूळ व धान्यादी मालाची स्वतंत्र साठा व वितरण नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तसेच, गोदामामध्ये भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांना सदर नोंदवही उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी प्रत्येक महिन्याला पुरवठेदाराच्या गोदामाला भेट देऊन तांदूळ व धान्यादी मालाचा दर्जा, साठवणूक, वितरण व शिल्लक याबाबतच्या नोंदीची तपासणी करणे आवश्यक आहे. सदरप्रमाणे कार्यवाही प्रत्येक महिन्याला करण्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद लातूर यांना कळविण्यात आले आहे.

**ग्रामविकास विभाग अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १६ नोव्हेंबर २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,समितीने उपरोक्त गोदामाला (गोडाऊन) भेट दिली असता पुरवठादार कर्मचाऱ्यांकडे ओळखपत्र नसणे, (ग्रेडवन) उच्च दर्जा मालाचे नमुने नसणे, करारनाम्याची प्रत गोदामामध्ये उपलब्ध नसणे, माती मिश्रीत मटकी आढळून येणे, जिल्हा परिषदेमधील कोणत्याही अधिकाऱ्यांनी गोदामाला भेट दिलेली नसणे, साठा पुस्तक छापील व प्रमाणित केलेले नसणे, तांदळाची प्रतवारी एकसारखी आढळून न येणे इत्यादी बाबी आढळून आल्या होत्या. विभागाच्या अभिप्रायामध्ये “शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ग्रामीण भागात धान्यादी मालांचा पुरवठा करणे व शहरी व ग्रामीण भागात तांदूळ वाहतूक करण्यासाठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे जिल्हानिहाय पुरवठादारांची नियुक्ती करण्यात येते. सदर पुरवठादारासोबत प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत करारनामा करण्यात येतो. सदर करारनाम्याची प्रत सर्व शाळांना उपलब्ध करून देण्यात येते. प्रस्तुत करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार शाळांना धान्यादी मालाचा पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक आहे. पुरवठादाराच्या अधिकृत कर्मचाऱ्यांकडे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी प्रमाणित केलेले ओळखपत्र असणे करारनाम्यातील तरतुदीनुसार बंधनकारक आहे असे नमूद केले आहे. यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीला माहिती दिली की, शालेय पोषण आहाराच्या बाबतीत शासन स्तरावर कडक अटी व शर्ती ठेवण्यात आलेल्या ओहत. तसेच पुरवठादाराने काय केले पाहिजे या बाबतीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतात. या शिवाय गोडाऊनमधील कर्मचाऱ्यांनी स्वतःचे ओळखपत्र जवळ ठेवले पाहिजे. गोडाऊनमध्ये नवीन कामगार आले तर त्यांना नवीन ओळखपत्र द्यावयास पाहिजेत. तसेच त्यांनी सुस्थितीतील वजनकाटा ठेवला पाहिजे. या बरोबरच त्यांनी आवश्यक ते अभिलेखे व गोडाऊमधील साठा हिशेब ठेवला पाहिजे. जेणेकरुन कोणतेही अधिकारी गोडाऊनला गेल्यास ते उपलब्ध अभिलेख्यांवरुन साठ्याची तपासणी करु शकतील. तसेच समितीने जेव्हा उपरोक्त गोडाऊनला भेट दिली होती त्यावेळी तेथे कोणीही जबाबदार व्यक्ती (इनचार्ज) उपस्थित नव्हती. तेथे केवळ मजूर उपलब्ध होते. त्यावेळी ते समितीला अभिलेखे दाखवू शकले नाहीत, सामुग्रीचा साठा दाखवू शकले नाहीत. परिणामी, समितीचे समाधान होऊ शकले नाही. अपेक्षा अशी आहे की, त्यांनी गोडाऊनमध्ये सर्व अभिलेखे ठेवले पाहिजेत आणि त्यांना ते दाखविता आले पाहिजेत.

सचिवांकडून मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, या मुद्याच्या अनुषंगाने विभागाने जी कारवाई केली त्यावर आपण समाधानी आहात काय ? यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी होकारात्मक संमती दर्शवली तद्नंतर पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले की, शालेय पोषण आहार हा अतिशय गंभीर विषय आहे. हा विषय केवळ लातूर जिल्ह्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. काही शाळांमध्ये तब्बल ९५ ते ९७ टक्क्यांपर्यंत पोषण आहार वितरित केला जातो. परंतु वस्तुस्थिती पाहिली तर त्या शाळेत विद्यार्थी संख्या खूप कमी प्रमाणात असते. अनेक शाळांतील विद्यार्थी अनुपस्थित

असतात, स्थलांतरित झालेले असतात, गाव सोडून गेलेले असतात, कुटुंबासोबत बाहेर गावी गेलेले असतात. परंतु तरी देखील त्या विद्यार्थ्यांना उपस्थित असल्याचे गृहीत धरुन पोषण आहार वितरित केल्याचे निदर्शनास येते. विद्यार्थी संख्येनुसार शाळेला पाठविलेल्या पोषण आहारापैकी विद्यार्थी उपस्थित नसल्यामुळे किती पोषण आहार शिल्लक राहिला याबाबतची माहिती विचारली असता ती शून्य असते. एकंदरीत जेवढी पटसंख्या असते त्या सर्व विद्यार्थ्यांना पोषण आहार वितरित केल्याचे दाखविले जाते ही अतिशय गंभीर बाब आहे. प्रामुख्याने शालेय पोषण आहाराच्या पुरवठादाराच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर तक्रारी असतात. शालेय पोषण आहाराचे कंत्राट हे राज्यस्तर आणि कन्झ्युमर्स फेडरेशनच्या माध्यमातून झालेले असते. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा शिक्षणाधिकारी यांना पुरवठादारावर कारवाई करण्याचा अधिकार नसतो. शालेय पोषण आहाराची तपासणी करून व माल प्राप्त झाल्याची सही घेतल्यानंतर त्या बाबतचा तपशील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे जाऊन पेमेंट घेण्यात येते. जर अशी कार्यपद्धती असेल तर मुख्य कार्यकारी अधिकारी काय कारवाई करणार ? दुसरी बाब अशी की, शालेय पोषण आहार अंतर्गत ५० किलो स्टॅण्डर्ड काटयांचा पुरवठा करण्यात येतो. बऱ्याच वेळा काटयांचे एकूण वजन ५० किलो असले तरी त्यात गोणीचे वजन अर्धा ते एक किलो असते. म्हणून त्या गोणीतील वजनात अर्धा ते एक किलो वजनाची धान्यात तफावत असते. परिणामी, प्रत्यक्षात त्या ठिकाणी ४८-४९ किलो माल असतो. प्रत्येक गोणीतून मालाची जी बचत होते त्यातून ठेकेदाराचा फायदा होतो. समितीने तपासणी केल्यानंतर असे अनेक प्रकार निदर्शनास आले. शालेय पोषण आहारांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या मालाचे वजन स्पष्ट असावयास पाहिजे. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार शाळेपर्यंत पोषण आहार पोहचला पाहिजे. तसेच आहाराच्या दर्जामध्ये सुधारणा झाली पाहिजे. यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीला विदित केले की, जसजशा या बाबी लक्षात येतात तसतसा त्या बाबत करारनाम्यात अंतर्भाव करण्यात येतो. मागील दोन-चार वर्षात हे मुद्दे लक्षात आल्यानंतर ते करारनाम्यात अंतर्भूत केले आहेत. उदाहरणार्थ पोषण आहाराची गोणी किती वजनाची असावी, गोणीच्या वजनात जास्त फरक असेल तर कसा व किती दंड आकारावा, पुरवठादाराने वेळेत पुरवठा केला नाही किंवा कमी-जास्त पुरवठा केला तर त्याला किती दंड आकारावा अशा छोट्याछोट्या बाबींचा उल्लेख करारनाम्यात केलेला आहे. अनेकदा दंड सुद्धा आकारुन वसुली करण्यात येते. तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी असताना सुद्धा सर्व विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिल्याचे दाखविले जाते.

समितीने शाळांना पुरवठा करण्यात आलेला पोषण आहार आणि अनुपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांमुळे किती मालाची बचत झाली असा प्रश्न विचारला तसेच पोषण आहाराची बचत झाल्याचे आपणास कुठेही निदर्शनास आले नाही. पंचायत समितीच्या बैठकीच्या वेळी शालेय आरोग्य तपासणीच्या वेळी अनेक विद्यार्थी गैरहजर असल्याचे निदर्शनास येते, तसेच विद्यार्थी गळतीचे प्रमाण सुद्धा असते. परंतु पोषण आहार मात्र १०० टक्के वितरित झालेला असतो. यावर अपर मुख्य सचिव यांनी समितीला विदित केले की, यासंदर्भात एकच उपाय आहे की, विद्यार्थी पटसंख्येच्या आधारावर शालेय पोषण आहाराचा पुरवठा करता कामा नये. प्रत्यक्षात विद्यार्थ्यांच्या सरासरी उपस्थितीनुसार पोषण आहाराचा पुरवठा केला पाहिजे. बायोमेट्रीक उपस्थिती नसल्यास प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या उपस्थितीच्या आधारावर शालेय पोषण आहाराचा पुरवठा करावयास पाहिजे. रेकॉर्डवर विद्यार्थ्यांची सरासरी उपस्थित असते. प्रत्यक्ष सरासरी उपस्थितीच्या आधारावरच शालेय पोषण आहार द्यावयास पाहिजे. यानंतर समितीने सचिवांना पुढीलप्रमाणे निदेश दिले की, मुळात विद्यार्थ्यांच्या शालेय उपस्थितीचे प्रमाण वाढावे म्हणून शालेय पोषण आहार सारख्या योजना राबविण्यात येतात. उदाहरणार्थ १०० विद्यार्थ्यांपैकी ३० विद्यार्थी गैरहजर असताना १०० विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार वितरित केल्याचे दाखविले जात असेल तर यातील तफावतीबाबत चौकशी केली पाहिजे.

### अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १२ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत लातूर जिल्हा परिषदेस भेट दिली त्यावेळेस दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ रोजी शालेय पोषण आहार गोडाऊन, लातूर येथे समितीने पाहणी केली असता असे निदर्शनास आले की, पुरवठादाराच्या कर्मचाऱ्यांकडे ओळखपत्र नसणे, उत्तम दर्जाच्या मालाचे नमुने नसणे, करारनाम्याची प्रत गोडाऊनमध्ये उपलब्ध नसणे, मातीमिश्रित मटकी आढळून येणे, जिल्हा परिषदेमधील कोणत्याही अधिकाऱ्यांनी गोडाऊनला भेट दिलेली नसणे, साठा पुस्तक छापील व प्रमाणित केलेले नसणे, तांदुळाची प्रतवारी एकसारखी आढळून न येणे, गोडाऊनमध्ये आलेला माल १० ते १२ दिवस तसाच पडून असणे तसेच गोडाऊनमधून मालाचा पुरवठा शाळांना झाल्यानंतर मालाचा नमुना तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यास आवश्यक असून ज्या नमुन्यांचा माल गोडाऊनमध्ये आहे त्याच दर्जाचा व नमुन्यांचा माल शाळांना दिला पाहिजे. जर प्रयोगशाळेने माल रद्द केल्यास तो माल पाच दिवसात परत करणे आवश्यक आहे. तथापि, अशा पध्दतीने काम झालेले समितीस आढळून आले नाही. शालेय पोषण आहाराच्या गोडाऊनमधील मालाच्या संदर्भात करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग झालेला असल्याने या प्रकरणाची करण्यात आलेली चौकशी ही कंत्राटदारास व जिल्हा परिषदेच्या या गैरव्यवहारात सामील असलेल्या संबंधित अधिकारी

व कर्मचारी यांना संरक्षण देण्याचा व त्यांना कारवाईपासून वाचविण्याचा या समितीचा हेतू दिसतो. जिल्हा परिषदेच्या चौकशी समितीने पंचायती राज समितीने पाहणी केलेल्या बाबींच्या विपरित चौकशी अहवालात निष्कर्ष नोंदविला ही बाब गंभीर असून समितीच्या अधिकारक्षेत्रात चौकशी समितीने अधिक्षेप केला असून पंचायती राज समितीलाच खोटे ठरविले असल्याने ज्या अधिकाऱ्याने हा अहवाल तयार केला व समितीने नोंदविलेल्या आक्षेपाविरूध्द चौकशी अहवाल शासनास सादर केला त्याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

पंचायती राज समितीने शालेय पोषण आहार गोदाम (गोडाऊन) लातूर येथे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये भेट देऊन तपासणी केली असता समितीस तेथे अनेक त्रुटी आढळून आल्या होत्या व गोडाऊन मधील मालाच्या संदर्भात करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग झालेला असल्याचे निदर्शनास आले होते. तथापि, शालेय पोषण आहाराच्या गोडाऊनची तपासणी व तेथील अनियमीततेची चौकशी करणेबाबत जिल्हा परिषदेकडून नेमण्यात आलेल्या समितीस "धान्यादी माल साठा सुस्थितीत दिसून आला, पुरवठादार यांच्या कर्मचाऱ्यांकडे ओळखपत्र आढळून आले, गोडाऊनमध्ये उपलब्ध असलेल्या मटकीमध्ये माती दिसून आली नाही, शिक्षणाधिकारी (प्रा.) व शालेय पोषण अधीक्षक यांनी भेटी दिल्या होत्या. तांदळाची सिलबंद पोती गोडाऊनमध्ये दिसून आली, सर्व वाहनांमध्ये डिजीटल वजन काटा असल्याचे दिसून आले, शिक्षण संचालक (प्रा.) महाराष्ट्र राज्य, पुणे व मे.एम.पी.भुतडा नियुक्त पुरवठादार, शालेय पोषण आहार योजना-जिल्हा लातूर यांच्याद्वारे करारनाम्यातील सर्व बाबींचे अनुपालन केले जात असल्याचे निदर्शनास आले." म्हणजेच जिल्हा परिषदेने नियुक्त केलेल्या चौकशी समितीला कोणत्याही त्रुटी आढळून आल्या नाहीत. **यावरून असे स्पष्ट होते की, या समितीने पुरवठादारास सहकार्य करण्याच्यादृष्टीने चौकशी करून जे या गैरव्यवहारात सामील आहेत. त्यांना वाचविण्याचा व त्यांना कारवाईपासून संरक्षण देण्याचा या चौकशी समितीचा हेतू दिसून येत असून पंचायतीराज समितीच्या अधिकारावर अधिक्षेप करण्याचा समितीचा आक्षेप आहे. जिल्हा परिषदेच्या चौकशी समितीने साक्षात पंचायतीराज समितीच्या सदस्यांनी प्रत्यक्षपणे भेटीच्या वेळी पाहणी केलेल्या बाबींस खोटे ठरविले असून शासनाने देखील जिल्हा परिषदेच्या या अहवालाचे समर्थन केले ही बाब दुर्देवी आहे. हा प्रकार समितीचा विशेषाधिकार भंग करणारा असून या चौकशी समितीच्या प्रमुखावर व इतर सदस्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावा.**

**शालेय पोषण आहार वितरणासाठी शासनाने संबंधित कंत्राटदारासमवेत करारनामा केला आहे. सदरच्या करारनाम्याची छायांकित प्रत ही प्रत्येक शाळेत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवली जाणे अनिवार्य आहे. परंतु समितीच्या भेटीच्या वेळी असे आढळून आले आहे की, बहुतांश वेळा सदरहू करारनाम्यातील अटी व शर्तीमधील माहिती संबंधित शाळेतील मुख्याध्यापक, विस्तार अधिकारी (शिक्षण) इत्यादींना नसते त्यामुळे कंत्राटदाराकडून ज्या वस्तू प्राप्त होतात त्या तशाच्या तशा घेतल्या जातात. यामध्ये अनेक वेळा कंत्राटदाराकडून करारनाम्यात नमूद केलेल्या वस्तू वा धान्य वितरणात अनियमितता केली जाते व त्यातून अनेक गैरव्यवहार होतात यासाठी शासनाने कंत्राटदारासोबत केलेल्या करारनाम्याची प्रत ही प्रत्येक शाळेत संबंधित शिक्षकांना माहितीस्तव पाठविण्याचे अनिवार्य करण्यात यावे व अशा करारनाम्यातील अटी व शर्तीमधील माहिती संबंधित शिक्षक व शिक्षण अधिकाऱ्यांना व्हावी यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांसाठी वर्षातून दोनवेळा प्रशिक्षण वर्ग आयोजित करावेत तसेच शालेय आहाराच्या वाहतुकीसाठी वाहनाचे क्रमांक प्रत्येक शाळेत नोंद करून करारनाम्यातील अटीप्रमाणे पालन करण्यात यावे याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी. तसेच या वितरण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर कंत्राटदार व शासनाचे अधिकारी गैरव्यवहार करीत असल्याने त्यात पारदर्शकता आणण्यासाठी कंत्राटदाराकडून पाठविण्यात आलेल्या मालवाहक पुरवठा वाहनांवर चोहीकडून दर्शनी भागात "शालेय पोषण आहार" असे स्पष्ट शब्दात फलक लावण्याचे व उक्त वाहनात डिजिटल वजनकाटा ठेवण्याचे अनिवार्य करावे. त्याचप्रमाणे पाठविलेल्या वस्तूंची पाकिटे, गोण्या इत्यादींवर "शालेय पोषण आहार" असे ठळक अक्षरात छापणे अनिवार्य करून शालेय पोषण आहार वितरण व्यवस्थेत पारदर्शकता निर्माण करावी कोणत्याही परिस्थितीत शालेय पोषणआहाराचे वितरण शाळेने निर्धारित केलेल्या वेळेतच करावे समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबत केलेली कार्यवाही समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

**ग्रामीण भागात शालेय पोषण आहार योजनेचा उद्देश सफल होण्याच्या दृष्टीने या योजनेची अमंलबजावणी ग्रामीणस्तरावर योग्य प्रकारे होणे आवश्यक आहे. यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह या योजनेच्या कामात सहभागी असलेल्या सर्व स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांचा या कामाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक असला पाहिजे व त्यापध्दतीने त्यांच्याकडून प्रामाणिकपणे जबाबदारीने काम होणे अपेक्षित आहे. असे समितीचे मत आहे. यास्तव**

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी प्रत्येक महिन्याला पुरवठादाराच्या गोडाऊनला भेट देऊन तांदूळ व धान्यादी मालाचा दर्जा, साठवणूक, वितरण व शिल्लक याबाबतच्या नोंदीची तपासणी करावी तसेच विद्यार्थी पटसंख्येच्या आधारावर शालेय पोषणआहाराचा पुरवठा न करता प्रत्यक्षात विद्यार्थ्यांच्या सरासरी उपस्थितीनुसार पोषण आहाराचा पुरवठा करावा त्याचप्रमाणे पुरवठादारासोबत प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत केलेल्या करारनाम्याची प्रत सर्व शाळांना उपलब्ध करून दयावी व करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग होणार नाही याची दक्षता पुरवठादाराने घ्यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी प्रमाणित केलेले ओळखपत्र गोदामातील कर्मचाऱ्यांकडे असणे शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत केलेल्या करारनाम्यातील तरतूदीनुसार बंधनकारक असून असे ओळखपत्र नसणारी व्यक्ती आढळून आल्यास पुरवठादारास रूपये ५०००/-इतक्या दंडात्मक रक्कमेची तरतूद आहे. त्यानुसार याप्रकरणातील संबंधित पुरवठादाराची चौकशी करून कारवाई करण्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, लातूर यांना विभागाने कळविले आहे. त्यानुसार केलेल्या दंडात्मक कारवाईची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, लातूर

## सन २०१४-२०१५ या वर्षातील बाबनिहाय उत्पन्न व अखर्चित राहिलेल्या रकमांबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १२ सप्टेंबर,२०१८ या कालावधीत लातूर जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१४-२०१५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने पंचायत समिती लातूर येथे साक्ष घेतली असता, साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, पंचायत समितीचे सन २०१४-१५ या वर्षाचे बाबनिहाय उत्पन्न किती होते व त्या वर्षात कोणत्या बाबींवर किती खर्च करण्यात आला, तसेच सन २०१८ अखेर पंचायत समितीकडे किती रक्कम शिल्लक होती व ती रक्कम शिल्लक राहण्याची कारणे काय आहेत ? सदर रक्कम पुढील वर्षात खर्च करण्यात आली आहे काय ? यावर गटविकास अधिकारी यांनी समितीला विदित केले की,पंचायत समितीचे अहवाल वर्षात १,३२,९२,८९६ रुपये उत्पन्न होते. त्यापैकी मार्च २०१८ अखेर ४,७८,२६३ इतकी रक्कम शिल्लक होती. सदर रक्कम मार्चअखेर उशिराने प्राप्त झाल्यामुळे खर्च झालेला नाही. यावर समितीने मार्च २०१८ अखेर इतकी रक्कम शिल्लक राहण्याची नेमकी कारणे काय आहेत ? असा प्रश्न विचारला असता अपंग लोकांसाठी खेळांचे साहित्य पुरवठा करण्यात येणार होता तो पुरवठा मार्च अखेरपर्यंत न झाल्यामुळे सदर रक्कम त्या वर्षात खर्च करता आलेली नाही. त्यामुळे अपंगांसाठी राखीव असलेली रक्कम शिल्लक राहिलेली आहे. मिळालेल्या उत्तराच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की बजेटमध्ये तरतूद केल्यावर योजनेवर खर्च केला जात नाही ही बाब बरोबर नाही. अपंगासाठी योजना तयार केली नाही तर बजेटमध्ये प्रोव्हीजन का करण्यात आली  हा निधी कोणत्या लेखाशीर्षाखाली ठेवण्यात आला. याबाबीकडे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी दुर्लक्ष केले. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, अपंगांसाठी ३ टक्के निधी मंजूर करण्यात आला होता. याबाबत पुढील काळात दक्षता घेण्यात येईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, अहवाल वर्षात  बांधकाम  लेखाशीर्षाखाली ७,२५,०४५ रुपये व आरोग्य लेखाशीर्षाखाली १०,९८,१२९ रुपये इतकी रक्कम शिल्लक राहण्याची काय कारणे आहेत, यावर तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केला की, अहवाल वर्षात आरोग्य लेखाशीर्षाखाली ६४,२०,००० रुपयांची तरतूद करण्यात आली होती. आरोग्याची कामे गट निहाय घेण्यात आली होती. पंचायत समितीमार्फत काही गटांच्या कामामध्ये बदल झाल्यामुळे ३५ कामे पूर्ण झाली व इतर कामे शिल्लक राहिली आहेत. यावर ज्या कामांमध्ये बदल झाला त्या कामांसाठी बजेटमध्ये सुधारणा करण्यात आली होती काय, असा प्रश्न समितीने विचारला असता, तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की,सुधारित बजेट करण्यात आले नाही. समितीने विचारणा केली की, १ एप्रिल रोजी आपल्या कामांना सुरुवात झाली, पंचायत समितीसाठी जेवढा निधी आला तेवढा निधी आपण खर्च करु शकत नाही. ही बाब बरोबर नाही. पंचायत समितीचे सदस्य सांगतात की, आम्हाला काही अधिकार नाहीत व कामासांठी निधी मिळत नाही. दरमहा पगाराचा आस्थापना खर्च किती आहे. सहायक लेखा अधिकारी यांनी विदित केले की, दरमहा १३ लक्ष रुपये पगारावर खर्च करण्यात येत आहेत. समितीने विचारणा केली की,  आपण पगारावर निधी खर्च केला परंतु कामावर खर्च केलेला नाही. ज्या अधिकाऱ्यांनी आपापली कामे केली नाहीत, योजना राबविल्या नाहीत, तरी देखील त्यांचे पगार काढण्यात आले. त्यामुळे सक्षम प्राधिकाऱ्यांकडून सदर रक्कम वसूल केली पाहिजे. योजना राबविण्यात येत नाही याबाबत संबंधित सचिवांची साक्ष घेण्यात यावी. वार्षिक लेखे सादर करताना निधी अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत. यावर सहायक लेखा अधिकारी यांनी विदित केले की, मागील तीन वर्षात सरासरी रक्कम जमा झाली होती. काही बाबींवर रक्कम खर्च करण्यात आलेली नाही. यावर समितीने विचारणा केली की, अंदाजपत्रकानुसार तीन वर्षातील सरासरी रकमेइतकी प्रोव्हीजन केली पाहिजे. मार्च महिन्यात निधी येत असला तरी त्या संदर्भातील कार्यवाही थांबविण्याची आवश्यकता नाही. कंत्राटदाराने वेळेत मालाचा पुरवठा केलेला नसल्यामुळे काही रक्कम खर्च करता आलेली नाही.

तद्नंतर समितीने नाराजी व्यक्त करून निदेश दिले की, पंचायत समितीचा निधी त्याच वर्षात खर्च झाला पाहिजे ही जबाबदारी पंचायत समितीच्या सर्व विभाग प्रमुखांची आहे त्याचप्रमाणे सदर रक्कम खर्च होते किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेतील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व विविध विभागांचे खाते प्रमुख असून त्यांनी याकडे लक्ष दिले पाहिजे. आपणाकडे एक कोटी रुपयांची तरतूद असताना त्यातील २० लाख रुपये अखर्चित राहतात ही बाब बरोबर नाही.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत माहिती मागविली.**

सन २०१४-१५ या वर्षातील बाबनिहाय उत्पन्न व खर्चाच्या कामावरील अनियमिततेबाबत :-

पंचायत समिती, लातूर अंतर्गत सन २०१४-१५ या वर्षामध्ये बाबनिहाय उत्पन्न व बाबनिहाय खर्चाच्या अनुषंगाने वेतनवाढ खर्च न झाल्यामुळे योजना राबविण्यात न आल्याप्रकरणी चौकशी करण्यात येवून संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे. नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्दयासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती लातुरचे सन २०१४-१५ या वर्षाचे बाबनिहाय उत्पन्न व खर्च खालील प्रमाणे आहे.

| जमा | | खर्च | | | |
|---|---|---|---|---|---|
| तपशील | रक्कम | लेखाशिर्ष | तरतुद | झालेला खर्च | शिल्लक |
| पंचायत समिती उपकर | ८६,३१,७०६ | ३-शिक्षण | १०,७०,००० | १०,४९,१७६ | २०,८२४ |
| लोकवाटा | २५,९१,७०० | ४-बांधकाम | १०,००,००० | २,७४,९५५ | ७,२५,०४५ |
| अनामत | ५,२७,८३० | ८-वैद्यकीय | १,००,००० | ४९,६९० | ५०,३१० |
| सुरक्षा ठेव | १,०९,२७८ | ९-आरोग्य | ६४,२०,००० | ५३,२१,८७१ | १०,९८,१२९ |
| इतर (निविदा शुल्क/इमारत /भाडे/व्याज) | ११,३२,३८२ | ११-कृषी | १२,००,००० | ११,९३,१४५ | ६,८५५ |
| | | १२-पशुसंवर्धन | २५,००,००० | ५०,८२,२०० | ० |
| | | १४-समाज कल्याण | ४२,००,००० | ४२,००,४४४ | ० |
| | | १८-महिला बालकल्याण | ४,८६,००० | ४,१४,१९० | ७१,८१० |
| | १,३२,९२,८९६ | एकूण .. | १,६९,७६,००० | १,७५,८५,६७१ | १९,७२,९७३ |

सन २०१४-१५ मधील पंचायत समिती उपकर योजनेंतर्गत बांधकाम विभागावर रु. ७,२५,०४५/- एवढा खर्च कमी झाला असुन सदरील खर्च हा सन २०१५-१६ मध्ये रूपये ७,२५,०४५/- पैकी रु. ६,९९,२०१/- एवढा खर्च झाला आहे व ९- आरोग्य या लेखाशिर्षा खाली तरतुद रू. ६४,२०,०००/- पैकी खर्च रु. ५३,२१,८७१/- एवढा झाला असुन शिल्लक रक्कम रु. १०,९८,१२९/- एवढी रक्कम पैकी पुढील आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**ग्रामविकास विभाग:**—जिल्हा परिषदेच्या कार्यवाहीस विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने लातूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती, लातूर अंतर्गत सन २०१४-१५ या वर्षामध्ये बाबनिहाय उत्पन्न व बाबनिहाय खर्चाच्या अनुषंगाने वेतनावर खर्च न झाल्यामुळे योजना राबविण्यात न आल्याप्रकरणी चौकशी करण्यात येऊन संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई करण्यात आली, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

यावर अपर मुख्य सचिव (ग्रामविकास विभाग) यांनी समितीला विदित केले की, सन २०१४-१५ मध्ये खर्च झाला होता. त्यावेळी केवळ १० लाख रुपये शिल्लक होते. ती रक्कम कॅरिफॉवर्ड होते. ती रक्कम दोन वर्षात खर्च करण्याची परवानगी असते.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १२ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत लातूर जिल्हा परिषदेस भेट दिली. वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान लातूर पंचायत समितीचे सन २०१४-२०१५ या वर्षाचे बाबनिहाय उत्पन्न व खर्च याबाबतची माहिती तपासली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, या पंचायत समितीकडे उक्त वर्षात एकूण रूपये १,३२,९२,८९६/- इतकी उत्पन्नाची रक्कम जमा झालेली असताना संपूर्ण निधी खर्च झालेला नाही. बांधकाम लेखाशीर्षाखाली रूपये ७,२५,०४५/- व आरोग्य लेखाशीर्षाखाली रूपये १०,९८,१२९/- इतकी रक्कम अखर्चित राहिली आहे. तसेच दिव्यांग व्यक्तींसाठीच्या खेळांच्या साहित्यांचा मार्च अखेर पर्यंत पुरवठा न झाल्याने त्यांच्यासाठी असलेला राखीव निधीही अखर्चित राहिलेला आहे.

वास्तविक जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पाणी पुरवठा योजना, आवश्यकतेनुसार विहिरी, खेड्यातील रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्रे, प्राथमिक शाळा व त्यांच्या इमारती इत्यादी सारख्या स्थानिक व सामुहिक विकासाच्या जिल्हा परिषद शासकीय व अभिकरण निधीतील योजनांना ज्या आर्थिक वर्षात निधी मंजूर करण्यात आलेला आहे, त्याच वर्षी सदरहू निधी खर्च करून कामे पूर्ण झाली पाहिजेत, असे समितीचे मत आहे.

**याबाबतची संपूर्ण जबाबदारी जिल्हा परिषदेतील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व पंचायत समितीच्या विविध विभागांच्या सर्व खाते प्रमुखांची आहे. परंतु योग्य नियोजन न केल्यामुळे आरोग्य विषयक महत्वाची कामे झालेली नसल्याने आरोग्य व बांधकाम लेखार्शीर्षाखालील निधी अखर्चित राहिलेला आहे. तसेच दिव्यांग व्यक्तींसाठीचा राखीव निधीही अखर्चित राहिलेला आहे. सदरहू बाब निश्चितच गंभीर स्वरूपाची असल्याने याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

**यापुढे शासनाच्या विविध विकासाच्या व आरोग्यविषयक योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना त्यांच्याकडे विविध करांच्या माध्यमातून जमा झालेला निधी व शासनाकडून प्राप्त झालेला निधी विहीत वेळेत त्याच अर्थिक वर्षात खर्च करावा व निधी अखर्चित राहणार नाही याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी व पंचायत समितीच्या विविध विभागांच्या सर्व खाते प्रमुखांनी घ्यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

# परिशिष्ट

# समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**सोमवार, दिनांक १० सप्टेंबर, २०१८**

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, लातूर

**उपस्थिती :**

(१) श्री.सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री.चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.
(६) प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.
(७) श्री.राहुल मोटे, वि.स.स.
(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(९) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.
(१०) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री.श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव
(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री.ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक लोकप्रतिनिधी**

श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, कामगार तथा पालकमंत्री

**स्थानिक पदाधिकारी**

(१) श्री.मिलींद लातूरे, अध्यक्ष, जिल्हा परिषद, लातूर
(२) श्री.रामचंद्र तिरूके, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, लातूर
(३) श्रीमती संगीता घुले, सभापती, महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषद, लातूर
(४) श्री.संजय दोरवे, सभापती, समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद, लातूर
(५) श्री.प्रकाश देशमुख, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, लातूर
(६) श्री.अनिल भिसे, सभापती, पंचायत समिती, रेणापूर
(७) श्री.सत्यवान कांबळे, सभापती, पंचायत समिती, देवणी
(८) श्रीमती सुनिता डावरे, सभापती, पंचायत समिती, चाकूर
(९) श्री.अजित माने, सभापती, पंचायत समिती, निलंगा
(१०) श्रीमती भिक्का वर्षा सतिश, सभापती, पंचायत समिती, शिरुर अ.
(११) श्री.धोंडीराम बिराजदार, सदस्य, जिल्हा परिषद, लातूर
(१२) श्री.सुरेश लहाने, सदस्य, जिल्हा परिषद, लातूर
(१३) श्री.बसवराज बिराजदार, सदस्य, जिल्हा परिषद, लातूर
(१४) डॉ.संतोष वाघमारे, सदस्य, जिल्हा परिषद, लातूर
(१५) श्री.राहूल केंद्रे, सदस्य, जिल्हा परिषद, लातूर

**स्थानिक निधी लेखा संचालनालय, नवी मुंबई**

श्री.प्रताप मोहिते, संचालक.

**ग्रामविकास विभाग**

(१) श्री.पंडीत जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(२) श्री. संतोष कराड, अवर सचिव, ग्रामविकास विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय**

(१) श्री.पारस बोथरा, उपायुक्त, आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
(२) श्री.अनंत कुंभार, सहाय्यक आयुक्त (विकास)
(३) श्री.शा.मो.यु.शेख, सहाय्यक संचालक (लेखा)

**जिल्हा परिषद, लातूर**

(१) डॉ.विपीन इटणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री.एस.डी.जोशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री.सुधीर भातलवंडे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
(४) श्री.एन.आर.केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
(५) श्री.यु.व्ही.साळुंखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
(६) श्री.जे.एस.शेख, उप मख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)
(७) श्री.एम.एम.कुलकर्णी, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)
(८) श्री.ए.एन.गौरकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा)
(९) श्री.आर.आर.जवळगेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(१०) श्री.बी.आर.शेलार, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग
(११) श्री.पी.के.पवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग)
(१२) श्री.ए.बी.मोहरे, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(१३) श्री.ए.एस.उकिरडे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(१४) श्री.बी.यु.बोधनकर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१५) श्री.एस.के.मिनगीरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(१६) डॉ.पराग गंगोधर, तालुका आरोग्य अधिकारी
(१७) श्री.बी.एस.रणदिवे, कृषि विकास अधिकारी
(१८) श्री.डी.एच.दाईगडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर
(१९) श्री.टी.के.भालके, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, औसा
(२०) श्री.ए.पी.पाटील, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर
(२१) श्री.एस.आर.यमुलवाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर
(२२) श्री.आर.व्ही.मुक्कावार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा
(२३) श्री.एस.एम.गोडभरले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर
(२४) श्री.एम.वाय.अभंगे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर
(२५) श्री.जे.डी.गोरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जळकोट
(२६) श्री. एस.ए.अकेले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी

(२७) श्री. एन.एस.शेरखाने, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अ.

(२८) श्री.ओमप्रकाश निला, कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, लातूर

(२९) डॉ.सी.आर.धनगे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी

(३०) श्री.बी.आर.शेलार, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील लातूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०१८**

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, लातूर

**उपस्थिती :**

(१) श्री.सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री.चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.
(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(७) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.
(८) प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(१०) श्री.राहुल मोटे, वि.स.स.
(११) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(१३) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.
(१४) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री.श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव
(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री.ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**विभागीय आयुक्त कार्यालय**

(१) श्री.पारस बोथरा, उपायुक्त, आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
(२) श्री.श्याम पटवारी, सहाय्यक आयुक्त (चौकशी)
(३) श्री.अनंत कुंभार, सहाय्यक आयुक्त (विकास)

**जिल्हा परिषद, लातूर**

(१) डॉ.विपीन इटणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री.एस.डी.जोशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री.सुधीर भातलवंडे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(४) श्री.एन.आर.केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(५) श्री.यु.व्ही.साळुंखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(६) श्री.जे.एस.शेख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(७) श्री.एम.एम.कुलकर्णी, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)

(८) श्री.ए.एन.गौरकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा)

(९) श्री.आर.आर.जवळगेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(१०) श्री.बी.आर.शेलार, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

(११) श्री.बी.आर.शेलार, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१२)श्री.ओमप्रकाश निला, कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, लातूर

(१३) श्री.पी.के.पवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग)

(१४) श्री.ए.बी.मोहरे, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१५) श्री.ए.एस.उकिरडे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१६) डॉ.सी.आर.धनगे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी

(१७) श्री.बी.यु.बोधनकर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१८) श्री.एस.के.मिनगीरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१९) डॉ.पराग गंगोधर, तालुका आरोग्य अधिकारी

(२०) श्री.बी.एस.रणदिवे, कृषि विकास अधिकारी

(२१) श्री.डी.एच.दाईगडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर

(२२) श्री.टी.के.भालके, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, औसा

(२३) श्री.ए.पी.पाटील, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर

(२४) श्री.एस.आर.यमुलवाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर

(२५) श्री.आर.व्ही.मुक्कावार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा

(२६) श्री.एस.एम.गोडभरले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर

(२७) श्री.एम.वाय.अभंगे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर

(२८) श्री.जे.डी.गोरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जळकोट

(२९) श्री. एस.ए.अकेले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी

(३०) श्री. एन.एस.शेरखाने, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक - २ संदर्भात लातूर जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०१८**

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, लातूर

**उपस्थिती :**

(१) श्री.सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री.चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.
(६) श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(७) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.
(८) प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(१०) श्री.राहुल मोटे, वि.स.स.
(११) श्री.दिपक चव्हाण, वि.स.स.
(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(१३) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री.श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव
(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री.ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा संचालनालय, नवी मुंबई**

श्री.प्रताप मोहिते, संचालक.

**ग्रामविकास विभाग**

(१) श्री.पंडीत जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(२) श्री.संतोष कराड, अवर सचिव, ग्रामविकास विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय**

(१) श्री.पारस बोथरा, उपायुक्त, आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
(२) श्री.श्याम पटवारी, सहाय्यक आयुक्त (चौकशी)
(३) श्री.अनंत कुंभार, सहाय्यक आयुक्त (विकास)
(४) श्री.शा.मो.यु.शेख, सहाय्यक संचालक (लेखा)

**जिल्हा परिषद, लातूर**

(१) डॉ.विपीन इटणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री.एस.डी.जोशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री.सुधीर भातलवंडे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
(४) श्री.एन.आर.केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
(५) श्री.यु.व्ही.साळुंखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
(६) श्री.जे.एस.शेख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)
(७) श्री.एम.एम.कुलकर्णी, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)
(८) श्री.आर.आर.जवळगेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(९) श्री.ओमप्रकाश निला, कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, लातूर
(१०) श्री.बी.आर.शेलार, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग
(११) श्री.पी.के.पवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग)
(१२) श्री.बी.आर.शेलार, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा
(१३) श्री.ए.एन.गौरकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा)
(१४) डॉ.सी.आर.धनगे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी
(१५) श्री.ए.बी.मोहरे, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(१६) श्री.ए.एस.उकिरडे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(१७) श्री.बी.यु.बोधनकर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१८) श्री.एस.के.मिनगीरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(१९) डॉ.पराग गंगोधर, तालुका आरोग्य अधिकारी
(२०) श्री.बी.एस.रणदिवे, कृषि विकास अधिकारी
(२१) श्री.डी.एच.दाईगडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर
(२२) श्री.टी.के.भालके, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, औसा
(२३) श्री.ए.पी.पाटील, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर
(२४) श्री.एस.आर.यमुलवाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर
(२५) श्री.आर.व्ही.मुक्कावार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा
(२६) श्री.एस.एम.गोडभरले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर
(२७) श्री.एम.वाय.अभंगे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर

(२८) श्री.जे.डी.गोरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जळकोट

(२९) श्री. एस.ए.अकेले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी

(३०) श्री. एन.एस.शेरखाने, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील लातूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १७ जुलै, २०१९**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(४) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(५) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
(४) श्री. किशोर दराडे, वि.प.स.
(५) श्री. निलय नाईक, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)
(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री.मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(३) श्री.नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. सु.रा.भोसले, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री.दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
(२) श्री.विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग)
(३) श्री.एस.डी.सुर्यवंशी, सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(४) डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग
(५) श्री.म.रं.शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग
(६) श्री.विजयकुमार कलवले, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग
(७) श्री.आत्माराम लुबडे, अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
(८) श्री.प्रमोद पाटील, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग

**जिल्हा परिषद, लातूर :**

(१) डॉ.विपीन इटनकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री.एस.डी.जोशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री.प्रभु जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
(४) श्री.उदयसिंह साळुंखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
(५) श्री.रत्नराज जवळगेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(६)	श्री.जी.जी.परगे, जिल्हा आरोग्य अधिकारी
(७)	डॉ.वैशाली जामदार, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(८)	श्री.पी.के.पवार, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग
(९)	श्री.बी.आर.शेलार, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

सन २०१३-२०१४ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग), सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग, अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२१**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. कैलास घाडगे पाटील, वि.स.स.
(३) श्री. अनिल पाटील, वि.स.स.
(४) श्री. शेखर निकम, वि.स.स.
(५) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.
(६) श्री. हरिभाऊ बागडे, वि.स.स.
(७) श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, वि.स.स.
(८) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.
(९) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य**

(१) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(२) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(३) श्री. किशोर दराडे, वि.प.स.
(४) श्री. महादेव जानकर, वि.प.स.
(५) श्री. सदाभाऊ खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्रीमती दिपा देशपांडे, संचालक.

**मंत्रालयीन विभागीय सचिव/अधिकारी :-**

(१) श्री. राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग
(२) श्री. संजय चहांदे, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा विभाग
(३) श्री. नंद कुमार, अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग
(४) श्री. मंगेश मोहीते, सह सचिव, ग्रामविकास विभाग
(५) श्रीमती नीला रानडे, अवर सचिव, ग्रामविकास विभाग.
(६) श्री.विजयकुमार कलवले, सहायक निर्देशक, रोजगार हमी योजना.

**जिल्हा परिषद, लातूर :**

(१) श्री. अभिमन्यू गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
(२) श्री.संतोष जोशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
(३) श्री. प्रभु जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर.

(४) श्री.रत्नराज जवळगेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

(५) श्री. दशवंत व्ही.व्ही., प्राथमिक शालेय शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद , लातूर

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

सन २०१३-२०१४ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा विभाग, अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सह सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.
(३) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
(६) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.
(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. सुनिल परब, कक्ष अधिकारी
(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. माधव नागरगोजे, संचालक.

**मंत्रालयीन विभागीय सचिव/अधिकारी :-**

(१) श्री. राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग
(२) डॉ. नितीन करीर, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग
(३) डॉ. प्रदीप व्यास, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
(४) श्रीमती वन्दना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग
(५) श्री. नंद कुमार, अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, रोजगार हमी योजना.
(६) श्रीमती आय. ए. कुंदन, सचिव, महिला व बाल विकास विभाग
(७) श्री. वि.ल. लहाने, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
(८) श्री. सतिश तुपे, सह सचिव, वित्त विभाग
(९) श्री. मंगेश वसंत मोहिते, सह सचिव, ग्रामविकास विभाग
(१०) श्री. श्री. दे. लोंढे, उपसचिव, ग्रामविकास विभाग
(११) श्री. प्रविण जैन, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(१२) श्रीमती नीला रानडे, अवर सचिव, ग्रामविकास विभाग
(१३) डॉ. विजय वृंदेवए, सहसंचालक, आरोग्य विभाग

**जिल्हा परिषद, लातूर :**

(१) श्री. अभिमन्यु गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
(२) श्री. गोकुळ देवरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण, जिल्हा परिषद,लातूर
(३) श्री. रत्नराज जवळगेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

(४) श्री. भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर

(५) श्री. संताजी माने, प्रशासन अधिकारी आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, लातूर

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

सन २०१३-२०१४ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग,अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, रोजगार हमी योजना, सचिव, महिला व बाल विकास विभाग, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,सह सचिव, वित्त विभाग, सह सचिव, ग्रामविकास विभाग,सहसंचालक, आरोग्य विभाग,उप सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांची उर्वरित मुद्यांसंदर्भात साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(४) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(५) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

(६) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(९) श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

(१०) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

(११) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

(१२) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

(३) श्री. सदाशिव खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. प्रकाश थिटे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने बैठकीत बारावा अहवालाच्या प्रारूपावर विचार करून किरकोळ सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई